काबरा एक्सप्रेस
डेली AC बस / अर्जंट पार्सल सर्विस • फुल लोड / पार्ट लोड सर्विस उपलब्ध
गुजरात अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद,नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश इंदौर, (राज महौल्ला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र मुंबई, (वर्सई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक पुणे
राजस्थान उदयपुर, अजमेर, जयपुर दिल्ली मोरी गेट
साऊथ बंगलोर, हैदराबाद, गोवा
अहमदनगर नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड 7972872112
EE-Q-MEDIA

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

जगप्रसिद्ध नामांकित ब्रॅण्डचे दर्जेदार होम अप्लायन्सेस एकाच छता खाली...
• फ्रीज • ए.सी. • वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
COMPRO Systems & Services
HDB FINANCIAL SERVICES BAJAJ FINSERV
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०
PHILIPS LG SONY KENSTAR JVC Electrolux

रजि नं. १११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, बुधवार दि. २८.०८.२०२४ | अंक नं. १५२ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

गणेशोत्सवापूर्वी अहमदनगर-मनमाड महामार्गाच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करा

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश

नगर- भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने गणेशोत्सवापूर्वी अहमदनगर-मनमाड महामार्गाच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करावीत आणि रस्त्यावरील सर्व खड्डे तातडीने दुरुस्त करावे, असे निर्देश राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे मनमाड रस्त्याबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्षे, भारतीय महामार्ग प्राधिकरणाचे विभागीय अधिकारी अंशुमाली श्रीवास्तव, प्रकल्प संचालक अनिल गोरड, धनु झोडगे (दुरदुरुप प्रणालीद्वारे) आदी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात समस्यांचा सामना करावा लागतो आहे. पावसाळ्यापूर्वी करावयाची दुरुस्तीची कामे वेळेवर करण्यात आली नाही. महामार्गाच्या थांबलेले काम पूर्ण करण्यासाठी नवा कंत्राटदार निवडतांना त्याची काम करण्याची क्षमता लक्षात घ्यावी. खड्डे बुजविण्यासाठी एकाचवेळी एकापेक्षा अधिक संस्था नियुक्त करून तातडीने महामार्गाची दुरुस्ती करण्यात यावी. प्रशासनाचे आवश्यक तेथे सहकार्य घ्यावे. रस्ता त्वरित वाहतूक योग्य करण्यात यावा.

गणेशोत्सवापूर्वी नगर-मनमाड महामार्गाच्या दुरुस्ती कामाची पूर्तता करावी यासाठी बैठकीत मार्गदर्शन करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील. समवेत इतर शासकीय अधिकारी.

एनएचएआयच्या अधिकाऱ्यांनी त्वरित महामार्गाला भेट देऊन तातडीने दुरुस्तीची कामे सुरू करावी. वाहतूक वळविण्यासाठी वाहतूक मार्शल पुरेशा प्रमाणात नियुक्त करावे. नगर-छत्रपती संभाजीनगर, श्रीरामपूर-नेवासे मार्गावरील खड्डेदेखील बुजविण्यात यावे. दुरुस्तीची कामे करतांना आवश्यक्तेनुसार वाहतूक वळविण्यात यावी. कोल्हार येथील पुलाच्या दुरुस्तीचे आणि रुंदीकरणाचे काम त्वरित सुरू करण्यात यावे, असे निर्देश विखे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले, शिर्डी ते अहमदनगर रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे आहेत. सण-उत्सवाचे दिवस असल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे महामार्गावरील खड्डझ्यांची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी. त्यासोबतच कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी आणि रस्त्याचे काम लवकर पूर्ण करण्यासाठी गांभीर्याने कार्यवाही करावी.

रस्त्याचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. पुढील आठवड्यात मार्गावरील सर्व खड्डे बुजविण्यात येतील, असे महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

SONI TILES Since 1965 AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel : (0241) 2418720 Mob. 9372497999
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite

पाहिजेत
अहमदनगरमधील नामांकित सुवर्णदालन चंदुकाका ज्वेल्स, सावेडी येथील शोरूमसाठी सुंदे आहेत.
सेल्समन जागा ५ (स्त्री) | हेल्पर जागा २
कामाची वेळ : सकाळी १० ते रात्री ९ पर्यंत
इच्छुक उमेदवारांनी सविस्तर अर्ज बायोडाटासह शुक्रवार व शुक्रवार सकाळी ११ ते १ यावेळेत समक्ष भेटावे.
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02

EARTH'S Green Library Greenery for Every Space
Fresh Environment with Indoor Plants
Get a Plant Today!
• Potted Planters • Premium Planters • Garden Accessories • Garden Furniture • Garden Lightings
Amit Sanklecha 9923143334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

नगर शहरामध्ये नव्याने सुरु होणाऱ्या भव्य सुवर्णदालनासाठी
पाहिजेत
सेल्समन सेल्सगर्ल 30 जागा
2-3 वर्षांचा अनुभव आवश्यक
ऑफिसबॉय 5 जागा
किमान १०वी पास
आकर्षक पगार आणि इन्सेन्टिव्ह
खालील पत्त्यावर अर्जासह समक्ष भेटा
वेरूळेश्वरणा ज्वेलर्स
पोखरणा हाऊस, नवीपेठ, अ.नगर

आमची चव आहे न्यारी, म्हणूनच प्रत्येक जण म्हणतो लयभारी !
संथन
Special गुजराथी थाली
फक्त ३२५/-
१ दिलकश रोड, ज्योतिबा चौक, पुणे बस स्टॉप जवळ, अहिल्यानगर - ४१४००१. ९४२१० ९४२२२

पंडीत दीनदयाळ जयंती १०८ मैं अपनो लिए नही, अपनों के लिए हू।

पं.दीनदयाळ पतसंस्था व दीनदयाळ परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने
सृजनशिल व संवेदनशील नगरकरांतर्फे एकमुखी नावाजलेली...

पं.दीनदयाळ व्याख्यानमाला
तरूणाई अन् समाजाच्या क्रांतीकारी प्रबोधनासाठी शहराची सर्वोत्तम वैचारिक चळवळ

बदलाची आस-विचार आचारांची धरूनी कास..
शहराच्या सर्वांगीण विकासाचा धरू या ध्यास..

शुक्रवार दि. ३० ऑगस्ट २०२४ सायं. ६ ते ९
अध्यक्ष: महंत रामगिरी महाराज, मठाधिपती, सद्गुरु गंगागिरी महाराज संस्थान, श्री क्षेत्र सराला बेट
उद्घाटक: मा.श्री.नानासाहेब जाधव, प्रांत संघचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, प. महाराष्ट्र
- प्रमुख वक्ते -
मा.श्रीमती औ. श्रृति, केरळ — विषय : लव्ह जिहाद, धर्मांतराचं जळजळीत वास्तव ! जिनं हे सारं भोगलं, सोसलं, त्या 'द केरळ स्टोरी' चित्रपटातील प्रत्यक्ष नायिकेचं अंगावर शहारे आणणारं जाहीर सत्यकथन
आचार्य श्री. के.आर. मनोज, केरळ — संस्थापक व संचालक, आर्ष विद्या समाजम् धर्मांतर विरोधी अभियानाचे प्रवर्तक आणि सनातन धर्माचे जागतिक प्रचारक

शनिवार दि. ३१ ऑगस्ट २४ सायं. ६ ते ९
प्रमुख वक्ते: मा.खा.डॉ. सत्यपाल सिंह, उ.प्रदेश (माजी पोलिस महासंचालक, मुंबई,माजी केंद्रीय मंत्री) — विषय : दहशतवाद असा संपवायचा असतो..!! तरूणाईच्या डोळ्यात झगझगणीत अंजन घालणारं भेदक शब्दफेक
प्रमुख अतिथी: मा.श्री. राकेशजी ओला (पोलिस अधिक्षक, अहिल्यानगर)

रविवार दि. १ सप्टेंबर २४ सायं. ६ ते ९
प्रमुख वक्ते: मा.श्रीमती माधवी लता, हैद्राबाद (प्रसिद्ध तमिळ आणि तेलुगू चित्रपट अभिनेत्री, प्रभावी वक्ता) — विषय : राष्ट्र माझे.. मी राष्ट्राचा ! ज्वलंत धगधगत्या हिंदुत्ववादी विचारांचा जागर
प्रमुख अतिथी: मा.डॉ. गिरीष कुलकर्णी (संघटक, स्नेहालय)

सोमवार दि. २ सप्टेंबर २४ सायं. ६ ते ९
प्रमुख वक्ते: मा.श्री. पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ, दिल्ली (ज्येष्ठ पत्रकार तथा प्रखर राष्ट्रभक्त विचारवंत) — विषय : वेद भविष्यातील अंतर्गत आव्हानांचा हिंदूंनो.. सावधान..! देश पोखरला जातोय !
समारोप
प्रमुख अतिथी: मा.आमदार प्रा. रामजी शिंदे (माजी पालक मंत्री)
मा.डॉ. रविंद्र सातळकर (मा. अध्यक्ष, जनकल्याण समिती, महाराष्ट्र)

३० ऑगस्ट ते २ सप्टेंबर रोजी रोज सायं. ६ ते ९ माऊली सभागृह, झोपडी कॅन्टीन जवळ, सावेडी, अ.नगर
श्री. वसंत लोढा, संस्थापक / चेअरमन
* विनित व स्वागतोत्सुक *
विकास पाथरकर । सुधीर पगारीया
मिलींद गंधे । धनंजय तागडे
पं.दीनदयाळ पतसंस्था व दीनदयाळ परिवार

वैचारीक, संस्कारक्षम, क्रांतीकारी व्याख्यानमालेस आमच्याही शुभेच्छा..!
ॲड. कृष्णा कुंडलिक जायभाय (ॲडव्होकेट, मुंबई उच्च न्यायालय) B.A.LLB., LL.M यशोदानगर, पाईपलाईन रोड, सावेडी, अ.नगर
बाळासाहेब बोराटे, माजी उपनगराध्यक्ष, अहमदनगर महानगरपालिका
Dishan

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - के.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

फिरता-फिरता.. प्रवासानुभव वाचता वाचता

भारतीय क्रांतिकारकांच्या स्मृती जपणाऱ्या फ्रान्स, लंडन, अंदामानपासून मुस्लीम राष्ट्र इस्तंबुल व शत्रुवत वागणाऱ्या पाकिस्तानपर्यंत अन् सततच्या युद्धजन्य परिस्थितीवर मात करून विकासाची कास धरणाऱ्या इस्लाम्यापासून ते स्वर्गीय सुंदरींनी नटलेल्या बाली या बेटापर्यंत व्यापक सफर घडविणारं पुस्तक म्हणजे हरफन्मौला लेखक द्वारकानाथ व त्यांच्या पत्नी सुप्रिया संझगिरी यांचे पुस्तक फिरता-फिरता हे एक फिरता फिरता ओळख करून देतं.

जगमरातल्या वैविध्यपूर्ण संस्कृतींची, तिथल्या माणसांची, त्यांच्या बेधुंद नाईट लाईफची आणि हा तिथल्या पाळीव प्राण्यांच्या चैनीचीही! सोबत सुप्रिया संझगिरी ओळख करून देत आहेत देशोदेशीच्या खाद्य संस्कृतीची तसंच पाकिस्तानच्या लोकजीवनाचीही.

वाचनीय मननीय
मे रणा दायी
अक्षर धन
"मुसाफिर"-९८२२०२०६९१

या पुस्तकातून त्यांनी फिरण्यातला आनंद कसा उपभोगला हे मांडतांनाच त्या आनंदात वाचकानाही सामावून घेतलंय. क्रिकेटच्या सामन्यांपासून फिल्मीगिरी, प्रवास कवतांना त्यांना या फिरण्याचे व्यसनच आहे. त्यांची लेखनशैली, अलंकारिक शब्दरचना, खुसखुशीत तुलनेतून भावव्यक्तता वाचकांना नक्कीच भावेल.

यात बाली, इस्तंबुल, इस्लामलबद्दल लिहिलंय. सर्वात मोठ्या मुस्लीम देश इंडोनेशियात बाली हा प्रांत ९९% हिंदूंचा आहे. इस्तंबुलमध्ये धर्मातीतता अनुभवता येते. इस्लाम तर थेट ज्वालामुखीच्या तोंडावरच वसलंय.

सातव्या वेतन आयोगासाठी उपोषणास बसलेल्या कामगार युनियनच्या पदाधिकाऱ्यांना पाठींबा देण्यासाठी चारही प्रभाग कार्यालये बंद ठेवत आंदोलनस्थळी जमलेले मनपा कर्मचारी (छाया - लहू दळणी)

कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन सुरू केल्याने जुन्या महापालिकेतील जन्म मृत्यू विभागाला लावलेले कुलूप उपहासाच्या प्रतीकेत बसलेल्या महिला. (छाया - धनेश कटारिया)

महापालिका कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाची तीव्रता वाढली

महापालिकेचे चारही प्रभाग कार्यालये कर्मचाऱ्यांनी ठेवली बंद, दैनंदिन कामकाज झाले ठप्प; नागरिकांची मोठी गैरसोय

नगर - महापालिका कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाचा प्रश्न गेल्या आठ वर्षापासून प्रलंबित असून तो राज्य सरकारने तातडीने मार्गी लावावा यासाठी मनपा कर्मचारी युनियन्च्या वतीने उपोषण सुरू केले असून आज तिसऱ्या दिवशी मनपा कर्मचाऱ्यांनी चारही प्रभाग कार्यालय बंद ठेवून उस्फूर्तपणे उपोषणाला पाठिंबा दिला असल्यामुळे मनपात शुकशुकाट पहायला मिळाला.

दरम्यान उपोषणकर्ते बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर, बाबासाहेब राशिनकर यांची तथ्येत खालावत चालली आहे, जो पर्यंत राज्य सरकार कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोगाचा निर्णय होत नाही तोपर्यंत आम्ही उपोषण मागे घेणार नाही असा इशारा यावेळी दिला.

नगर मनपा कर्मचाऱ्यांचा सातवा वेतन आयोग लागू व्हावा यासाठी तिसऱ्या दिवशीही उपोषण सुरू असून यावेळी शहर अभियंता मनोज पारखे, आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे, घनकचरा विभाग प्रमुख अशोक साबळे, गणेश लयचेट्टी, उद्यान विभाग प्रमुख शशिकांत नजन, किशोर कानडे, भीमराज कानगुडे, सतीश बनकर, हेमा साळळे, मेमूल, देशमुख, कुलकर्णी, जोशी, युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर, बाबासाहेब राशीनकर, तसेच सचिव आनंद वायकर, माजी अध्यक्ष अनंत लोखंडे, नंदकुमार नेमाने, राहुल साबळे, बलराज गायकवाड, सागर सालुंके, अजय सौदे, प्रफुल लोंढे, अजित तारु, अंतवन क्षेत्रे, विजय कोतकर, बाळासाहेब व्यापारी, अकील सय्यद, सखाराम पवार, महादेव कोतकर, अमोल लहारे, दिपक मोहिते, नागनाथ पवले, वसंत थोरात, अनवर शेख, सुनील चाफे, मेहेर लहारे, वैभव जोशी, परीक्षित बिडकर, राजू लयचेट्टी तसेच महापालिकेतील पुरुष व महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कर्मचाऱ्यांनी उपोषणस्थळी आपल्या भावना व्यक्त करताना महापालिका प्रशासन व सरकारवर नाराजी व्यक्त करत म्हणाले की महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याचे काम प्रशासनाचे होते, मात्र कुठल्याही उपयोजना केल्या नाही, याचबरोबर आस्थापना खर्च जास्त असल्याचे कारण देत सरकार वेळ काढूपणा करत आहे, कर्मचारी उपाशी ठेवायचे आणि तुम्ही तूपाशी राहायचे हा कुठला न्याय ? कर्मचाऱ्यांनी आता एकीची ताकद दाखवत जो पर्यंत आमची मागणी मान्य होत नाही तोपर्यंत मागे हटणार नाही, कर्मचारी राबंदिवस आपले कर्तव्य बजावत असतो मात्र त्याचा कष्टाला फळ मिळत नसल्याची प्रतिक्रिया कर्मचाऱ्यांनी यावेळी दिली.

लहान भावाने केला मोठ्या भावाचा खून

सावेडी उपनगरातील घटना, आरोपीला पोलिसांनी केली अटक

नगर - दारूच्या नशेत लहान भावाने मोठ्याला मारहाण करून त्याचा खून केल्याची घटना सावेडी उपनगरातील भिंगारदिवे मळ्यात सोमवारी रात्री घडली. स्वप्निल प्रदीप मुळे (वय ३२, रा. भिंगारदिवे मळा, सावेडी) असे खून झालेल्याचे नाव आहे. त्याचा लहान भाऊ शुभम प्रदीप मुळे (रा. भिंगारदिवे मळा, सावेडी) याच्याविरुध्द तोफखाना पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

याबाबत संजय लक्ष्मण सोनवणे (वय ४७, रा. भिंगारदिवे मळा, सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या भिंगारदिवे मळ्यातील खोलीत स्वप्निल व शुभम हे दोघे राहत होते. त्यांना दोघांना दारू पिण्याचे व्यसन असल्याने त्यांच्यात नेहमीच वाद होत होते. त्यांच्यात सोमवारी (दि.२६) सायंकाळी वाद झाल्याचे फिर्यादीला त्यांच्या मुलाने सांगितले. फिर्यादी यांनी घटनास्थळी जाऊन पाहिले असता स्वप्निल जखमी अवस्थेत असल्याचे दिसून आले. त्याला फिर्यादीने विचारणा केली असता शुभमने मारहाण केल्याचे त्याने सांगितले. जखमी स्वप्निल याला फिर्यादी व शुभम यांनी उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे त्याच्यावर उपचार सुरू असताना मंगळवारी (दि.२७) पहाटे दोन वाजता त्याचा मृत्यू झाला.

दरम्यान, घटनेची माहिती मिळाल्यानंतर शहर पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी पथकासह घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेत अटक केली आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

शोभाबाई मेहेर यांचे अल्प आजाराने निधन

नगर - येथील सारसनगर भागात राहणाऱ्या शोभाबाई मेहेर (वय ६८, आष्टीवाला) यांचे २८ ऑगस्ट रोजी पहाटे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या स्व. विनोदलाल शांतीलाल मेहेर यांच्या पत्नी तर चेतन पंकज, वैभव मेहेर यांच्या मातोश्री तर पोपटलाल, जयकुमार, झुंबरलाल, विजय गांधी (मिरीवाला) यांच्या बहिण होत.

अर्जुन भापकर यांचे अल्प आजाराने निधन

नगर - येथील माळीवाडा भागातील गोंधळेगल्लीतील रहिवासी अर्जुन बापूसाहेब भापकर (वय ५८) यांचे २१ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे २२ ऑगस्ट रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, पत्नी, १ भाऊ, ३ बहिणी, भाऊजय, मेहुणे, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. ते बालाजी पार्नसटरचे संचालक होते.

अरविंद शिंदे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - सावेडी उपनगरातील श्रीराम चौक येथील श्रीरामनगर मधील रहिवाशी व स्टेट बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी अरविंद दत्तात्रय शिंदे (वय ७५) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले.

नगर येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. शिंदे हे धार्मिक व मनमिळावू स्वभावाचे होते. नगर, जामखेड येथील स्टेट बँकेच्या शाखेमध्ये त्यांनी सेवा दिली. २००६ मध्ये ते सेवानिवृत्त झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नगर येथील एच. डी. बी. फायनान्सचे क्षेत्रीय अधिकारी अभिजीत शिंदे यांचे ते वडील होत.

ज्ञानेश्वर मोरे यांचे अपघाती निधन

श्रीरामपूर - येथील वाहन चालक ज्ञानेश्वर रघुनाथ मोरे (वय ४८) यांचे २६ ऑगस्ट रोजी पहाटे १ वा. कानपूर, लोणीकाळे येथे अपघाती निधन झाले.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, एक भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे. फॅब्रिकेटर्स प्रकाश मोरे यांचे थोरले बंधू, चि.निखिल व नंदन मोरे यांचे वडील होत.

अल्पवयीन मुलाचे बळजबरीने धर्मांतर करण्याचा प्रयत्न

मौलानासह एकावर ॲट्रोसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल

श्रीरामपूर - श्रीरामपूर तालुक्यातील गोंडेगाव येथील एका अल्पवयीन मुलाला त्याच्या जातीबद्दल अपशब्द बोलून, त्याला मिती दाखवून त्याचे धर्मांतर करण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात मौलानासह एका जणावर ॲट्रोसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील गोंडेगाव येथील राजेंद्र लोखंडे यांचा तेरा वर्षांचा मुलगा सार्थक राजेंद्र लोखंडे हा अल्पवयीन असल्याचे माहिती असताना, त्याच्या वयाचा फायदा घेऊन येथील एका समाजाच्या मौलाना व गावातीलच बादशाहा ऊर्फ शोएब शकील सैय्यद यांनी त्याला फुस लावून मुस्लीम धर्मात येण्यासाठी नमाज व अजाण शिकविले. शिकविलेले नमाज व अजाण रोज करण्यास सांगून, नाही केले तर त्याच्या जातीचा उल्लेख करून तुमच्या एकट्या घराला संपवून टाकू अशी धमकी दिली. तसेच हे घरच्यांना सांगितले तर तुला दोरीने बांधून ठेऊ, नाहीतर तुझ्यासह तुझ्या घरच्यांना जिवे मारून टाकू, अशी धमकी दिली.

याप्रकरणी राजेंद्र लोखंडे यांनी तालुका पोलीस ठाण्यामध्ये दिलेल्या फिर्यादीवरुन येथील मौलाना (नाव माहीत नाही) व बादशाहा ऊर्फ शोएब शकील सैय्यद याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गोंडेगाव येथे काही दिवसापूर्वीच आराध्य दैवत श्री गणपती मंदिरांच्या चौथर्यावर काळ्या पिशवीत मांस आढळल्याची घटना समोर आली होती. त्यामुळे संतप्त गावकऱ्यांनी गाव बंदची हाक दिली होती. त्यानंतर कोणतीही कारवाई पोलीस प्रशासनाने केली नाही. या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले गेले. त्यामुळे गावकरी आणखी आक्रमक झाले. चौकशीअंती तपासाचे चक्रे फिरवून कही व्यक्तीचे पोलीस प्रशासनाने जबाब नोंदविले त्यावरून हा प्रकार उघडकीस आला.

स्वरसरींनी रंगली स्वरस्मृतींची मैफल

नगर - श्रुती संगीत निकेतन या संस्थेच्या वतीने प्रा.अभिजित अपस्तंभ आणि सौ.मानसी अपस्तंभ यांच्या शास्त्रीय, उपशास्त्रीय आणि सुगम गायनाची स्वरस्मृती ही रावसाहेब पटवर्धन सभागृह येथे आयोजित करण्यात आलेली मैफल अतिशय रंगली. मैफलीची सुरुवात प्रा.अपस्तंभ यांनी मिया मल्हार या रागाने केली. विलंबित व द्रुत एकतालातील दोन बंदिशी त्यांनी रंजकतेने आणि तयारीने सादर केल्या.



श्रुती संगीत निकेतन संस्थेच्या वतीने प्रा. अभिजित अपस्तंभ आणि सौ. मानसी अपस्तंभ दोन बंदिशी त्यांनी रंजकतेने सादर करताना.

त्यांनी अबीर गुलाल, काटा रुते कुणाला, सर्वात्मका सर्वेश्वरा ही लोकप्रिय पदे तर मानसी अपस्तंभ यांनी भेटी लागी जीवा, कर्मन की गती न्यारी, कजरी, गर्द सभोवती ही पदे सादर केली. संस्थेच्या वतीने प्रा.अपस्तंभ आणि सौ. अपस्तंभ यांना गुरुपौर्णिमेच्या दिवशी डॉ.देवीप्रसाद खरवंडीकर व कीर्तिदेवी खरवंडीकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रथम नादसरिता दाम्पत्य पुरस्कारानेने सन्मानित करण्यात आले होते.

प्रा.अभिजित अपस्तंभ हे न्यू आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयात संगीत विभागात कार्यरत आहेत तसेच सौ.मानसी अपस्तंभ या ही गायन व अध्यापनाने संगीत प्रसाराचे कार्य करत आहेत. या मैफलीला तबल्यावर नगरचे सुप्रसिद्ध तबला वादक शेखर दरवडे व हार्मोनियम वर मकरंद खरवंडीकर यांनी अतिशय समर्पक साथसंगत केली. डॉ.धनश्री खरवंडीकर यांनी सूत्रसंचालन केले.

या मैफलीला भूषण भणगे, डॉ.हेमंत नाईक, हेमंत काळे, सविता काळे, ज्ञानेश्वर दुधाडे, महेश खोपटीकर, अनिरुद्ध धर्माधिकारी, पवन नाईक आदि तसेच नगरकर संगीत रसिक, साधक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्यातून पळवून आणलेल्या अल्पवयीन मुलीची नगरमध्ये सुटका

एमआयडीसी पोलिसांनी आरोपीला पकडून दिले पुणे पोलिसांच्या ताब्यात

नगर- पुणे येथून अल्पवयीन मुलीला पळवून आणलेल्या तरुणाला एमआयडीसी पोलिसांनी पकडले. त्याच्या ताबडीतून पीडित अल्पवयीन मुलीची सुटका केली असून त्यांना पुणे पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. सुभाष महादेव पवार (रा. गोकुळनगर, कात्रज, पुणे) असे आरोपीचे नाव आहे.

पुणे येथून एक तरुण अल्पवयीन मुलीला घेऊन नागापूर एमआयडीसी परिसरातील दुध डेअरी चौक येथे आला असल्याची माहिती मंगळवारी (दि.२७) पहाटे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांना मिळाली होती. त्यांनी रात्र गस्त पथकातील पोलीस उपनिरीक्षक जाधव, अंमलदार नवनाथ दहिफळे, राजेश राठोड, राजेंद्र सुद्रिक, विष्णू भागवत, किशोर जाधव, महिला अंमलदार बेंद्रे यांना माहिती कळवून खात्री करून ताब्यात घेण्याचे आदेश दिले.

पथकाने सदर ठिकाणी जाऊन खात्री केली असता तेथे एक तरुण व एक मुलगी मिळून आली. त्या तरुणाने त्याचे नाव सुभाष महादेव पवार असे सांगितले. पोलिसांनी अधिक चौकशी केली असता बिबवेवाडी (पुणे) पोलीस ठाण्यात सुभाष पंवार विरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल आहे. त्याने पीडित अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून आणले असल्याचे त्यांना समजले. त्यांनी बिबवेवाडी पोलिसांना माहिती दिली. बिबवेवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे गाठून तरुणासह पीडित अल्पवयीन मुलीला ताब्यात घेतले.

पुण्यातून अल्पवयीन मुलीला नगरमध्ये पळवून आणणाऱ्या आरोपीला पकडल्यानंतर त्याच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

तत्कालीन आयुक्त शंकर गोरे, पंकज जावळे यांनी मंजुरी दिलेल्या बांधकाम परवानग्यांची चौकशी करण्याचे आदेश

नगर - नगर महापालिकेचे तत्कालीन आयुक्त शंकर गोरे व डॉ.पंकज जावळे यांनी दिलेल्या सर्व बांधकाम परवानग्यांची चौकशी करण्याचे आदेश लाच लुचपत प्रतिबंध विभागाचे नाशिक विभागीय पोलिस अधिक्षक यांनी नगरच्या पोलिस उपाधिक्षकांना दिले आहेत.

तत्कालीन आयुक्त पंकज जावळे यांनी बांधिकाम परवानगी प्रस्ताव मंजूर करण्यासाठी संबंधित बिल्डरकडे ८ लाखांची लाच मागितल्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने जावळे व त्यांचे स्विय सहाय्यक यांचे विरोधात तोफखाना पोलिस ठाण्यात २७ जून रोजी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ व १२ अन्वये गुन्हा दाखल केलेला होता.

या गुन्ह्याचा तपास पोलीस उपअधिक्षक प्रवीण लोखडे करत असल्याने गुन्ह्याचे तपासाचे अनुषंगाने नगर रचना विभागात सन २०२१ ते जून २०२४ पर्यंत तत्कालीन आयुक्त शंकर गोरे, डॉ. पंकज जावळे तसेच नगर रचना विभागाचे सहाय्यक संचालक अजय चारठाणकर यांनी मंजुरी दिलेल्या रेखांकन (लेआऊट), बांधकाम परवानाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी शाकीर शेख यांनी लाचलुचपत विभागाच्या पोलिस महासंचालकांकडे केली होती. त्यांनी त्याची दखल घेऊन पोलीस अधीक्षक लाच लुचपत प्रतिबंध विभाग परिक्षेत्र नाशिक यांना चौकशी करण्याबाबत १ जुलै रोजी कळवले. त्याप्रमाणे पोलीस अधीक्षक यांनी १२ ऑगस्टला नगरच्या पोलिस उपअधीक्षक यांना गोपनीय आदेश करून गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी करण्याची आदेश केले आहेत.

गृहिणी

आरोग्य

मुले आणि गोड खाणे

लहान मुलांना लिमलेच्या गोळ्या, चॉकलेटे व कोला वगैरेसारखी मधुर शीतपेये घेण्याची सवय लावू नये. गोड पदार्थ आणि गोळ्या खाल्ल्यानंतर त्यांची भूक मरते, ती जेवत नाहीत आणि पौष्टिक आहार त्यांना मिळत नाही. शिवाय, असे पदार्थ खाल्ल्यामुळे दात किडतात हे वेगळेच.

पाककला

अकबऱ्या

साहित्य : तांदूळ, तूप, दळलेली साखर, लोणी, निरसे दूध.

कृती : तांदूळ तीन दिवस भिजत घालून ठेवावेत. नंतर धुऊन फडक्यावर कोरडे करून ते कुटावेत व अगदी बारीक पीठ करून घ्यावे. नंतर दोन वाट्या पिठात पाव वाटी तूप, पाव वाटी साखर व एक चमचा दूध घालून पीठ चांगले मळावे. लोणी घेऊन ते फडक्यात घालून चांगले दाबून अगर ब्लॉटिंग पेपरच्या साहाय्याने त्यातील पाणी शक्य तेवढे काढून टाकावे.

वरील मळून ठेवलेल्या पिठात हे लोणी पाव वाटी मिसळून, खूप मळून घ्यावे. जितके जास्त मळावे, तितके चांगले. नंतर एका पानावर अगर प्लॅस्टिकच्या कागदावर तुपाचा हात लावून घ्यावा. वरील तयार करून ठेवलेल्या पिठाची सुपारीएवढी गोळी घेऊन, ती त्या पानावर अगर कागदावर जोराने आपटावी व हळूच सोडवून घेऊन तळणीत टाकून तळावी.

वास्तू

उत्तर दिशेसंबंधी

* उत्तरेस वाहनतळ असणे अशुभ.
* उत्तर दिशेला उतार असल्यास शुभ. धनलाभ होतो.
* उत्तरेला तलाव विहीर असणे शुभ मानले जाते.
* उत्तर दिशेला विशेष रिकामी जागा सोडल्यास अनेक प्रकारे धनलाभ होतो.

सल्ला

तळघरात चांगला सूर्यप्रकाश व हवा येत नाही त्यामुळे मानवी जीवनाला पोषक वातावरण तेथे वाढू शकत नाही.

सौंदर्य

एकसारख्या आकाराच्या गळ्याचे पोशाख कायम वापरू नये. पोशाखात सतत बदल करावा.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २९ ऑगस्ट २०२४

अजा एकादशी, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, आर्द्रा १६।४०, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.

राशिभविष्य

मेष : अधिक चांगल्या रीतीने कार्यरत राहाल.

वृषभ : गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश मिळेल.

मिथुन : भावनांच्या भरात वाहून जाऊन नुकसान होण्याची शक्यता आहे.

कर्क : आपल्या व्यावसायिक योजना यशस्वी होतील. मात्र थोडे नुकसान संभवते.

सिंह : जुने सहकारी व मित्र भेटतील दिवस अनंदात जाईल.

कन्या : आज अपले हितशत्रू डोके वर काढतील. भातृचिंता सतावेल.

तूळ : वाहन चोरी होण्याची शक्यता आहे. कागदपत्रे हरवतील.

वृश्चिक : व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी समजेल. वैवाहित सौख्य लाभेल.

धनु : जुने मित्र व नातेवाईक भेटतील. अचानक धनलाभ संभवतो.

मकर : नोकरीपेशा व्यक्तींसाठी पगारवाढीचे योग आहेत.

कुंभ : अचानक तब्येत बिघडेल. घर व प्रॉपर्टीसंबंधी व्यवहार अयशस्वी होतील.

मीन : मागील उधारी व उसनवारी वसुल होईल. दिवस मजेत जाईल.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

हसा आणि शतायुषी व्हा!

काय येतं

शिक्षक – तुला गणित येत नाही, इतिहास येत नाही, विज्ञान समजत नाही. मग तुला येत तरी काय?

विद्यार्थी – या साऱ्यांचे नाव ऐकून घाम येतो

...चला करू स्पर्धा परीक्षांची तयारी

* सर्वाधिक वापरला जाणारा इनपूट डिव्हाईस – कि बोर्ड
* हिरा हे अपरुप असलेला वायू – कार्बन
* कटक मंडळावर निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाळ – ६ वर्षे
* रक्ताचे वेगवेगळे गट ज्यावरून पडलेले आहे ते द्रव्य – प्रतिद्रव्य व प्रतिगन

संदर्भ – 'कॉम्पिटिशन सक्सेस (जनरल नॉलेज) इंग्रजी मासिक

संकलन – **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

शब्दगंध क्र. ६९९९ सौ.शैलजा कुलकर्णी





आडवे शब्द :- २) शंभर हजार; लक्ष ३) एक धान्य; वरणा ५) रागाचा अतिरेक; रागाचा आवेश ७) नवनव्या कल्पना; लहर ८) लहानसहान गोष्टींचा एकत्रित मजकूर ११) जाणकार; ज्ञानी; शहाणा १३) वहाण; पादत्राण १५) जखम वगैरेचा त्वचेवर राहणारा डाग १६) दणकट; कणखर; मजबूत १७) रागाचा १७) समय; अवकाश; विलंब १८) लाकूड तासण्याचे सुताराचे हत्यार २०) फुलाची पूर्वावस्था २१) हाताचा अंगठा व तर्जनी यातील जास्तीतजास्त अंतर २२) डोके; मस्तक; शिर

उभे शब्द :- १) आवडलेले; मान्य केलेले २) एक पक्षान्न; सांजा ३) निष्णात; कुशल; प्रवीण ४) तमाशातील एक भाग; ओळख; वशिला ६) त्रास देणारे; परेशान करणारे ९) तांडयावर वस्ती करून राहणारा एक समाज १०) एक पक्षान्न १२) अनेक कुटुंबांनी एकत्र येऊन तयार केलेली वस्ती; ग्राम १३) समुद्र; मर्यादा; अंत १४) जेवणासाठी लागणाऱ्या पात्रांची जोडी १७) गावाचे प्रवेशद्वार १९) केस; खडी २०) गोष्ट; कहाणी

शब्दगंध क्र. ६९९८ चे उत्तर

उ	सं	त	■	सं	था	द	क	■
गा	■	प	रि	च	य	■	ह	■
सं	ध	न	■	■	अ	■	■	■
त	म	■	अ	■	मा	हो	ल	■
■	ध	■	हा	ट	क	■	क	■
शा	बी	ल	■	■	आ	■	सो	■
ग	त	■	प	ण	वा	न	क	■
र	■	ब	सा	■	स	र	ल	■

* * * * * * * मुलांचे विश्व * * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : विचारवंत होण्यापेक्षा आचारवंत व्हावे

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

नोबेल पारितोषिके कुणाला मिळतात?

दरवर्षी सर्वसाधारणपणे सप्टेंबर–ऑक्टोबरच्या सुमारास वृत्तपत्रांतून नोबेल पारितोषिके जाहीर होऊ लागतात. स्विडनची राजधानी स्टॉकहोम येथे या पारितोषिकांचे वितरण होते. या पारितोषिकाबद्दल एक सुवर्णपदक, एक प्रमाणपत्र आणि प्रचंड मोठी बक्षिसाची रक्कम मिळते.

वास्तवशास्त्र, वैद्यकशास्त्र, रसायनशास्त्र, साहित्य, शरीरविज्ञान वा वैद्यकशास्त्र तसेच शांतता आणि अर्थशास्त्र याबद्दल नोबेल पारितोषिके दिली जातात. जर एखाद्या क्षेत्रात एकापेक्षा जास्त पारितोषिके विजेते असतील तर बक्षिसाची रक्कम सर्वांना सारखी विभागून दिली जाते. या पारितोषिकांचे वितरण १० डिसेंबर या दिवशी म्हणजे आल्फ्रेड नोबेलच्या मृत्युदिनी होते.

२१ ऑक्टोबर १८३३ या दिवशी जन्मलेल्या आल्फ्रेड नोबेल या शास्त्रज्ञाने डायनामाईट या स्फोटकाचा शोध लावला. त्याचे वडीलही शास्त्रज्ञ होते. आपल्या शोधामुळे नोबेलला प्रचंड पैसा मिळाला. त्याच्या व्यात्गतून ही बक्षिसे दिली जातात.१९८२ पासून या बक्षिसात वाढ करण्याचे स्विडिश सरकारने ठरविले आहे. नोबेलच्या मृत्युपत्रात नसलेले शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र. या शास्त्राबद्दल प्रथम १९६९ मध्ये बक्षीस जाहीर झाले.

ही बक्षिसे 'नोबेल फौंडेशन ऑफ स्विडन' तर्फे देण्यात येतात.

स्विडनची 'रॉयल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस', वास्तवशास्त्र व रसायनशास्त्राच्या पारितोषिक विजेत्याची निवड करते, स्टॉकहोमची 'द कॅरोलाईन इन्स्टिट्यूट' वैद्यकशास्त्रातला विजेता ठरवते. 'स्विडिश ॲकॅडमी ऑफ लिटरेचर' साहित्यातला विजेता निवडते. नॉर्वेच्या पार्लमेंटने नियोजित केलेली समिती शांततेच्या पारितोषिकाच्या व्यक्तीचा शोध घेते. यासाठी आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या व्यक्ती किंवा संस्था यांनी या व्यक्तींची नावे सुचवायची असतात. त्यानंतरच या लोकांतून पारितोषिक विजेत्याची निवड होते.

चुकीचा मार्ग

एक अतिशय सुंदर हिरवे रान होते. त्या रानात एक पांढरा शुभ्र ससा राहात होता. ससा म्हटला म्हणजे तो फक्त हिरवे गवत खाऊन जीवन जगणारा प्राणी.

त्या सशाला कोवळे गवत फार आवडायचे. त्यामुळे तो रानात जास्त कष्ट न घेता आपल्या घराजवळील कोवळे आणि लुसलुशीत हिरवे गवत खाऊन पोट भरत असे.

ससा स्वभावाने अतिशय साधा व सरळ होता. त्याला जंगली प्राण्यांच्या वृत्तीबद्दल काहीही माहीत नव्हते. त्यांच्या स्वभावाची त्याला जरादेखील कल्पना नव्हती. कारण जंगलात अनेक प्रकारचे प्राणी रहात असतात.

एकदरीत खरी गोष्ट अशी होती की, त्या सशावर एक लबाड लांडगा टपून बसलेला होता. त्या सशाची शिकार करून त्याचे मऊ मांस खाण्याची त्याची तीव्र इच्छा होती. जेव्हा जेव्हा लांडगा सशाला पाहायचा तेव्हा तेव्हा त्या लांडग्याच्या तोंडाला पाणी सुटल असे व मनात एक विचार येत असे की, आपण ह्या सशाला केव्हा खाऊ. परंतु तो ससा काही लांडग्याच्या हाती लागत नव्हता. एकदा त्या लांडग्याने तशी संधी साधलीच व सशावर नजर ठेवून त्याने त्याचा पाठलाग केला; सशाला हे माहीत नव्हते. ससा आपल्याच नादात रानात गवत खात फिरत असताना अचानकपणे लांडग्याने त्याच्यावर झडप घातली. सशाचे दैव आडवे आले व तो सुदैवाने लांडग्याच्या तावडीतून सुटून जीव घेऊन पळत सुटला. परंतु ससा पळत होता. त्याला फक्त आपला जीव वाचविण्याची चिंता होती. जीव घेऊन पळण्याच्या नादात आपण कुठे जात आहोत याचे त्याला अजिबात भान नव्हते. कारण अशा प्रसंगी कोणालाही भान रहात नाही. पळता पळता त्याला एक गुहा दिसली. त्या गुहेत खूप अंधार होता. तेथे तो आपला जीव धरून बसला. त्याला हायसे वाटले. आपला जीव वाचल्याचे त्याला समाधान वाटले. परंतु ते समाधान थोडघाच वेळपर्यंत टिकले. कारण त्याला लगेच वाघाची डरकाळी ऐकू आली. ती ऐकून सशाची पाचावर धारण बसली. कारण वाघ म्हटल्यानंतर जंगलाचा राजा! म्हणून ससा घाबरला.

वाघाने सशाला आपल्या गुहेत पाहून आनंद व्यक्त केला. कारण त्याला आयती शिकार मिळणार होती. त्याप्रमाणे वाघाने एका क्षणात सशाचा चट्टामट्टा केला. म्हणजेच सशाला खाऊन टाकले.

तात्पर्य : प्रत्येक माणसाने एखाद्या छोटघाशा संकटातून बाहेर पडण्याकरिता सारासार विचार न करता कोणताही निर्णय घेतला व तो चुकीच्या मार्गाने गेला तर हमखासपणे तो मनुष्य मोठघा संकटात सापडतो.

जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)

दक्षिणेश्वर के संत (स्वामी रामाकृष्ण परम हंस) इस बारे में इस तरह कहते हैं : परमात्मा सब में है परन्तु सब परमात्मा में नहीं हैं। गुरु नानक साहब इस महान गुप्त भेद को हल करने और सब पर विजय प्राप्त करके इससे बाहर निकलने का सरल साधन बताते हुए फरमाते हैं–

मन इस समय भिन्न–भिन्न प्रकार की अनेक इच्छाओं जो इसको अपनी–अपनी दिशा में खींच रही हैं, के पीछे लगकर दुविधा में पड़ा हुआ है। इसे धीरे–धीरे दोबारा जोड़कर एक करना होगा ताकि इसके रोम–रोम में प्रभु का प्यार फूट पड़े। केवल तब ही यह आत्मा को खींच कर इधर–उधर, ऊँचे–नीचे चारों दिशाओं में ले जाने की जगह इसका सेवक बन सकेगा। जब तक इस मन रूप अनेक मुँह वाले अजगर को सीधा करके पालतू नहीं बना लिया जाता यह सम द्री देवते 'प्रोटियस की तरह मनमर्जी से शक्लें बदलता हुआ, घटिया चालों के साथ तथा गिरगिट की तरह रंग बदलता हुआ हमें भ्रम में डालने से नहीं रुकेगा। जब तक यह धरती और इसकी वस्तुओं से जुड़ा रहेगा, धरती माता से प्राप्त की हुई ताकत से ज्यादा से ज्यादा शक्तिशाली होता जायेगा। जिस तरह 'हरक्यूलिस' ने दैत्य 'ऐंटस' को, जो धरती माता से ताकत प्राप्त करता था और अजेय था, धरती से ऊपर उठा दिया था ठीक इसी तरह हमें मन को ऊपर उठाना होगा। जब एक बार यह ईश्वरीय ध्वनि धारा, उस ईश्वरीय संगीत के सम्पर्क में आ गया, यह नीचे खींचने वाले सभी रसों–कशों का हमेशा के लिये त्याग कर देता है और ऊपर उठ जाता है। इस तरह धीरे–धीरे थोड़ा सा और उपर उठकर यह अपने निज घर, चिताकाश, जो जन्म–जन्मान्तरों के संस्कारों का भण्डार भी है, में समा जाता है। यह वह स्थान है जहाँ यह प्राणों द्वारा खींचा हुआ मनोमयी और प्राणमयी दो लिबास (जो धरती पर काम करने के लिए मानसिक यन्त्र का काम देते हैं) और फिर एक स्थूल चोला अक्षमयी

कोष, जिसे स्थूल इन्द्रियाँ लगी हुई हैं और स्थूल संसार में काम करने के लिए जरूरी है, पहनकर नीचे आया था । शरीर रूपी जादू के डिब्बे में बन्द और दबे हुए हम अपने आपको एक बेड़ी लगे हुए कैदी की तरह महसूस करते हैं यद्यपि असल में हम इसके साथ पूर्णतया बंधे हुए नहीं हैं। यह पता नहीं कि किस तरह इस शरीर में स्थित आत्मा को अंतर्मुख करके इस शरीर से ऊपर उठाना है। युगों–युगान्तरों से महापुरुष एक ही आवाज में कहते आ रहे हैं कि अपने अन्तर चलो और अपने आप में प्रकाशित, अपने आपकी कर्ता शरीर रूपी अन्धेरी जेल के फेले हुए अन्धेरों में एक ही आस की किरण जीवन ज्योति की तरफ देखो। इसके बारे में बाईबल में इस प्रकार आया है । इसी रोशनी को दिन का सितारा कह कर पुकारा जाता है और यही श्रद्धालुओं के कदमों की रोशनी है जो उनके मन, आत्मा दोनों को आनन्दित करती हुई अनजाने में ही अपनी ओर खींचती जाती है और इसे जीवन की ज्योति धारा और धुन धारा के साथ ऊपर की चेतनता या ईश्वरीय चेतनता के मण्डलों की ओर इस तरह बहाकर ले जाती है जैसे कि इसे ज्योति में से निकलने वाले ईश्वरीय संगीत के पंख लग गये हों। एक रूपक के रूप में इसे ही सफेद परों वाला घोड़ा या पैगम्बर साहब को स्वर्ग में ले जने वाली बिजली या बारक कहा जाता है। **(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

शुद्ध जीवन जीने के मंत्र (शांति)

यदि हम स्वयं को आरोग्य प्रदान करना चाहते हैं तो हमें अपने भीतर बसी पीड़ा को पूरे साहस व ईमानदारी के साथ स्वीकार करना होगा और उसे त्यागना होगा। इस प्रक्रिया में हमें विवेक, धैर्य, प्रेम, करुणा, आपसी समझ, क्षमा तथा दयालुता का अभ्यास करना होगा।

जब हम क्रोध, पीड़ा व दुःख के स्थान पर शांति के पथ का अनुकरण करते हैं तो हमें विश्व शांति के प्रति योगदान देने का अद्भुत अवसर प्राप्त होता है। जिस प्रकार सरोवर में कंकड़ उछालने से तरंगें उठती हैं, उसी प्रकार हमारे उदाहरण से दूसरे व्यक्ति भी प्रेरित होते हैं। हम अपनी कथनी व करनी को एक करते हुए जीवन में बहुत बड़ा बदलाव ला सकते हैं; सही मायनों में बुद्ध बन सकते हैं। शांति एक आधारशिला है, जिस पर हम एक स्वस्थ व क्रियाशील समाज की नींव रख सकते हैं। शांति ही एक सभ्य समाज की प्रमुख विशेषता है और किसी भी समाज के सदस्यों की सामूहिक चेतना के माध्यम से उसका चरित्र जाना जा सकता है। एक सभ्यता स्वर्ग या नरक हो सकती है, जो उसके सदस्यों की सामूहिक चेतना पर निर्भर करता है। चेतना ही संस्कृति के नियम, मूल्यों व तंत्रों को विकसित करती है और चेतना ही संस्कृति का रूपांतरण भी कर सकती है। वर्तमान समय में सारा संसार विश्व शांति के लिए गुहार लगा रहा है। हम वास्तव में संघर्ष, गलतफहमियों, अज्ञान तथा दुराग्रहों के ऐसे युग में जी रहे हैं, जहाँ आपस में लड़ाई–झगड़ा, आलोचना, शिकायत करना, दूसरों को दोष देना

एक आम बात हो गई है। अनेक असहाय व्यक्ति निराश होकर यह मानने लगते हैं कि वे शोषक समाज का शिकार हो रहे हैं, जो उनके नियंत्रण से परे जान पड़ता है और उन्हें भीतर से किसी को आहत करने की तीव्र इच्छा उत्पन्न होती है। प्रत्येक स्थान पर राजनेता व नीति–निर्मात्ता शांति को बनाने तथा बनाए रखने के लिए दृढ संकल्पित हैं। पूरे संसार में शांति कायम रखने के लिए बहुत बड़ी संख्या में मानवीय संसाधन तथा शोध किए जा रहे हैं। यहाँ तक कि शांति के क्षेत्र में काम करनेवाले लोगों को पुरस्कार भी दिए जाते हैं। शांति के मूल्य पर बल दिया जाता है, क्योंकि चारों ओर शांतिहीनता का साम्राज्य है । इसने हमारे जीवन को इस तरह छिन्न–भिन्न कर दिया है कि हम कल्पना तक नहीं कर सकते । शांति का वचन हमें आशा की किरण तो देता है, परंतु कभी–कभी इसे पाने की तरह हमारे हाथ से ओझल होते देर भी नहीं लगती। हम मानव सभ्यता के दोराहे पर खड़े हैं। एक ओर सबकुछ तेजी से विलीन हो रहा है। युद्ध, गृह युद्ध, दंगे तथा आतंकवाद ने सारे विश्व को हिलाकर रख दिया है। वहीं दूसरी ओर एक लगभग अदृश्य मेल–जोल या एकत्रीकरण, विकल्पों व संभावनाओं का मेल करते हुए सारे बिखरे टुकड़ों को सहेजने के प्रयास में है। हमें समाज के सामाजिक, आर्थिक, राजनीतिक व अन्य परिदृश्यों में शांति को वापस लाने के लिए इसे दो स्तरों पर देखना होगा– बाहरी व भीतरी ।

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

मध

मधाच्या पोळ्यातून काढलेला ताजा मध हा पुष्टिकारक, किंचित कफकर, गुरू, सारक, स्निग्ध, सप्तधातुवर्धक व स्थूलता निर्माण करणारा असतो. तर एक वर्षापेक्षा जास्त काळ झालेला जुना मध हा लेखनकार्य करणारा असून, रूक्ष गुणधर्मांचा व स्थूलता कमी करणारा असतो. एक कप दुधामध्ये एक चमचा मध घालून प्याल्यास शक्ती वाढते. रोज सकाळी किंवा रात्री किंचित गरम पाण्यात एक ग्लास दुधात एक चमचा मध घालून प्याल्याने मलावरोध दूर होऊन शौचास साफ होते. तोंडामध्ये व्रण निर्माण होऊन त्याचा दाह होत असेल, तर मधयुक्त पाणी किंवा नुसता मध बराच वेळ तोंडात धरून तेवायला किंवा त्याच्या गुळण्या कराव्यात. यामुळे तोंड येणे, तोंडात व्रण पडणे. दाह, तृष्णाविकार (वारंवार तहान लागणे) हे सर्व तोंडाचे विकार दूर होऊन तोंड स्वच्छ होते. स्थूलत्वावर एक वर्षापेक्षा जास्त काळ झालेला जुना मध रोज सकाळी एक चमचा घेऊन त्यात अर्धे लिंबू पिळून एक ग्लास गरम पाण्यात हे मिश्रण घेतल्यास स्थौल्य कमी होऊन बांधा सुडौल होतो, तसेच आम्लपित्ताचा विकार कमी होऊन शौचास साफ होते. हे मिश्रण हृदयरोगांसाठी सद्धा उपयुक्त आहे. शरीरावरील जखमा व व्रण बरे होण्यासाठी जखमांवर मध लावावा. मध जतुनाशक असल्याने भाजल्यामुळे किंवा पोळण्यामुळे झालेल्या जखमा लवकर भरून येतात.

लहान बालकांची जर झोप कमी असेल, तर अशावेळी अर्धा पेला दुधातून दोन चमचे मध द्यावा. त्याने बालके लगेच झोपतात. हिरड्यांचे व दातांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी त्रिफळा चूर्ण + मंजिष्ठा चूर्ण + वटसाल चूर्ण यांचे सूक्ष्म चूर्ण एकत्र करून त्यात दोन चमचे मध मिसळावा व या मिश्रणाने दात व हिरड्या घासाव्यात. याने दात पांढरेशुभ्र होऊन चमकतात आणि हिरड्या मजबूत होतात. वंध्यत्व असणाऱ्या पुरुषांनी कामेच्छा निर्माण होण्यासाठी व शुक्रजंतूचे प्रमाण वाढविण्यासाठी नियमितपणे रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास थंड पाण्यात दोन चमचे मध घ्यावा. मध हा तारुण्य वाढविणारे प्रतीक असल्यामुळे तो शुक्रधातूचे प्रमाण वाढवून वार्धक्य दूर ठेवतो व तारुण्य जास्त काळ टिकवितो.

सावधानता : आयर्वेदानुसार तूप व मध यांचे समप्रमाणात एकत्र सेवन करणे हे हानिकारक असून, विषाप्रमाणे कार्य करते, असे सांगितले आहे. त्यामुळे या बाबतीत सावधानता बाळगावी.

– डॉ. शारदा निर्मल–महांडुळे

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहमदनगर मोबाईल नं– ८७९३४००४००

प्रति काशी पारनेरमधील बारा ज्योतिर्लिंगे

पाराशरऋषींच्या पावन वास्तव्याने पुनीत झालेले पारनेर हे पुरातन गाव प्रति काशी म्हणून ओळखले जाते. येथील बारा ज्योतिर्लिंगांची मंदिरे शिवभक्तांची श्रध्दास्थाने आहेत. श्रावण महिन्यातील प्रती दिनी आणि प्रती महिन्यातील शिवरात्रीस या ज्योतिर्लिंगांचे दर्शन विना विश्रांती घेतल्यास मनातील इच्छा पूर्ण होतात, अशी श्रध्दा पिढ्यान् पिढ्या जपली गेली आहे. सध्या श्रावण महिना सुरू असल्याने ही शिवालये भाविकांच्या गर्दीने फुलली आहेत. नोकरी व व्यवसायानिमित्त परगावी गेलेले पारनेरकर श्रावणाचे महत्व ध्यानी घेऊन गावी परतल्याने जुन्या आठवणींना उजाळा देणाऱ्या गप्पांचे फड रंगू लागले आहेत.

पारनेरमधील बारा ज्योतिर्लिंगांची दर्शन यात्रा गणेश खिंड येथील श्रीमालंवीढ गणेशापासून सुरू करू या. गणेश पुराण कथासार मधील ६१ व्या अध्यायात या स्थळाचे महत्व वर्णिलेले आहे. भारव्दाज ऋषींचे सुपुत्र भीम ऋषींच्या तपश्चर्येने प्रसन्न होवून श्री गणेश येथे प्रकट झाले. उत्तराभिमुख असलेल्या या मंदिराच्या गर्भगृहातील श्री गणेशाची स्वयंभू मूर्ती मनाला प्रसन्नता प्रदान करते. येथील शिलालेख मंदिराच्या प्राचीनत्वाकडे निर्देश करतो. डोंगराच्या कुशीत असलेल्या या निर्जन स्थानी मंदिराच्या एका बाजूला भूमीच्या पोटात एक गुहा दिसते. सेनापती बापट भूमिगत असताना या मंदिरात रहात असत.

१ श्री सोमेश्वर मंदिर

गणेशखिंडच्या पुढेच सोमेश्वर हे महादेवाचे प्राचीन मंदिर मोठ्या दरीमध्ये आहे. येथील घनदाट परिसर, फळा-फुलांनी बहरलेली झाडी, पावसाळ्यात खळाळणारा धबधबा शिवमहिम्न गाताना दिसतात. पर्वतनाथी आवड असणारे येथे अनघड वाटेने दगड-गोटे पार करत जंगली झुडूपांचा आधार घेत मंदिराच्या दिशेने पावले टाकत धामाने चिंब होण्याचा आनंद लुटतात.

२ श्री संगमेश्वर मंदिर

पारनेरमधील मणकर्णिका नदीच्या प्रशस्त घाटालगत असलेले संगमेश्वर मंदिर गतकाळातील वैभवाच्या स्मृती जागवते. मंदिरा सभोवती असलेली दगडी भिंतीची तटबंदी अभेद्य किल्ल्यासारखीच आहे. मंदिरासमोर दोन दगडी बांधणीचे दिमाखदार यज्ञकुंड आहेत. परिसरात बेलाचे वृक्ष आहेत. मंदिराच्या प्रवेशदारी नंदी मंडप असून नंदीच्या आयाळीतील नादवृन्गींची उभी मूर्ती लक्ष वेधून घेते. सभामंडपामधून गर्भगृहात प्रवेश करताच संगमेश्वर महादेवाच्या मनोवेधक पिंडीचे दर्शन होते. पाराशर ऋषींनी याच स्थानी यज्ञसोहळ्याचे आयोजन केले होते, असे सांगितले जाते.

३ श्री त्र्यंबकेश्वर मंदिर

मणकर्णिका नदीच्या पैलतीरावर असलेले हे त्र्यंबकेश्वर मंदिर कळस नसलेले आहे. पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिरासमोर जमिनीच्या पोटात खोलीसारख्या दगडी बांधकाम केलेल्या भागात नंदी विराजमान आहे. नंदी महादेवासमोर न रहाता तो जमिनीखाली का? हे गूढच आहे! मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारामधून आत जाताच उत्तर आणि दक्षिण दिशेस अगदी समोरासमोर दोन प्रवेशद्वारं आहेत. गर्दीच्या वेळी

प्रदक्षिणा घालण्याची ही व्यवस्था असावी. गर्भगृहातील शिवलिंग पहाताना नाशिकच्या त्र्यंबकेश्वर शिवलिंगाचेच दर्शन घेत आहोत, असे जाणवते. मंदिर परिसरातील स्वच्छता, शांतता, पक्षांचे बागडणे आणि हिरवीगार झाडी विसावा घेण्यातील आनंद द्विगुणीत करतात.

४ श्री काशीविश्वेश्वर मंदिर

पारनेरे शहरातील शाहुनगर मागत असलेले हे मंदिर मणकर्णिका नदी पात्राच्या अगदी काठावरच आहे. नदीच्या पात्रातील मणकर्णिका कुंड बारमाही पाणी असलेले आहे. मंदिरात प्रवेश करताना तब्बल नाच फूट रूंद असलेल्या भिंती पाहून मन थक्क होते. महिरपीची रचना असलेल्या प्रवेशदारीच ऐटीत बसलेला नंदी शिवाच्या सेवेत तत्पर असावे हा संदेश देतो आणि असे वाटते. पिंडीवरील शाळुंका पहाताना आपण नतमस्तक केव्हा झालो ते कळतही नाही. गर्भगृहाच्या देवळीतील गणरायाचे दर्शन घेऊन या काशीविश्वेश्वराला साकडं घालण्याची प्रथा असल्याचे भाविक श्रध्देने सांगतात.

५ श्री केदारेश्वर मंदिर

बोळकोबा गल्लीत असलेले केदारेश्वर मंदिर पश्चिमाभिमुख असून मंदिरास कळस नाही. मंदिरासभोवत पुरातन बारव आहे. मंदिराच्या आवारात पिंपळ आणि वड हे वृक्ष एकत्र वाढलेले दिसतात. गर्भगृहातील वालुकामय शिवलिंग स्वयंभू असून जागृत स्थान म्हणून ओळखले जाते.

६ श्री गढेश्वर मंदिर

पारनेरमधील महादेव गल्लीत असलेले पुरातन श्री गढेश्वर महादेव मंदिर गावात असूनही शांततेचा आनंद देते. महादेवाची उपासना कलीयुगात त्वरीत फळ देणारी असल्याचे गूढ गढेश्वर महादेव भाविकांना सांगतात, असे वाटते. मंदिराची बांधणी प्राचीन आहे. मंदिराच्या गाभाऱ्यामध्ये प्रकाश येण्याकरिता खास योजना केलेली दिसते. मंदिराच्या सभोवती जुने वाडे असलेली घरे आहेत.

७ पिंपळेश्वर तथा मल्लिकार्जुन मंदिर

मणकर्णिका नदीच्या काठावर असलेले पिंपळेश्वर तथा मल्लिकार्जुन मंदिर पश्चिमाभिमुख आहे. येथील शिलालेख मंदिराचा जीर्णोद्धार शके १२०१ मध्ये झाल्याचे सांगतो. मंदिराच्या प्रांगणात ऐसपैस जागा असून मोठे वृक्ष शिवालयातील गारवा सांभाळताना दिसतात.

८ श्री महाकालेश्वर मंदिर

कुंभार गल्लीतील पूर्वाभिमुख श्री महाकालेश्वर मंदिर श्री मल्लिकार्जुन मंदिराच्या मागेच आहे. चुन्नकडीचा वापर करून उभारलेल्या भिंती मंदिराच्या प्राचीनतेकडे लक्ष वेधतात. मंदिराच्या सभामंडपासारख्या भागात उजव्या सोंडेची गणपतीची शेंदूरचर्चित सुरेख मूर्ती आणि नागदेवतेची मूर्ती आहे. गणपती, नागराज आणि महादेवांचे एकत्रित दर्शन घेतल्यास संकटमुक्त झाल्याची प्रचिती येते, असे भाविक सांगताना दिसतात. महादेवाचे मंदिर अरूणाही येथे नंदी नाही!

९ श्री पाताळेश्वर मंदिर

पारनेर शहरातील बाजारतळाजवळ पूर्वाभिमुख असलेले पुरातन श्री पाताळेश्वर मंदिर आहे. मंदिरासमोर उघडावरच नंदीची कोरीव मूर्ती विराजमान आहे. पिरॅमिडसारख्या गाभाऱ्यामधील या शिवलिंगाचे दर्शन घेताना ध्यानमग्न होता येते. मंदिरासमोर दगडी बांधणीतील प्रशस्त चौकोनी बारव अरूण या बारवेच्या भिंतीतील कोनाडात गणपतीची सुबक बैठी मूर्ती आहे.

१० श्री नागेश्वर मंदिर

पारनेरचे ग्रामदैवत असलेले नागेश्वर गल्लीमधील श्री नागेश्वर मंदिर पुरातन असून अलिकडे उत्तमरित्या जिर्णोद्धार केले आहे. शिवलिंगावर चांदीचे आवरण सुरेखरित्या बसविण्यात आलेले आहे. गाभाऱ्यात भैरवनाथांची काळभैरव मूर्ती प्रतिष्ठापित केलेली दिसते. मंदिराच्या बाजूला पायऱ्यांची बारव आहे. या बारवेमधील पाणी आटत नाही, अशी लोकश्रध्दा आहे.

११ श्री भिमाशंकर मंदिर

पारनेर शहराच्या वरच्या वेशीजवळ घडवलेल्या दगडातील मजबूत बांधणीचे पश्चिमाभिमुख श्री भिमाशंकर मंदिर आहे. गाभाऱ्यामधील शिवलिंगावर प्रकाशझोत येईल असा झरोका मंदिराची उभारणी करताना तयार करण्यात आलेला दिसतो. पिंडीवरील उभी शाळुंका भाविकांना भावते.

१२ श्री सिध्देश्वर मंदिर

पारनेरपासून ३ किलोमीटर अंतरावर सिध्देश्वर दरा येथे दरीत असलेले हे पश्चिमाभिमुख श्री सिध्देश्वर मंदिर भाविकांना निसर्गाशी समरस होण्यातील आनंद देते. पाराशर ऋषींनी देवाधिदेव महादेवांकडून येथेच सिध्दी प्राप्त करून घेतल्या असे भाविक श्रध्देने सांगताना दिसतात. नंदीमंडपात नंदीची दिमाखदार मूर्ती विराजमान असून नंदीच्या आयाळीत नादवन्गी दिसतात. सभामंडप प्रशस्त आणि कलाकारांनी अविश्रांत मेहनत घेत नाजूक कलाकुसर केलेला आहे. गर्भगृहामधील सिध्देश्वर शिवलिंगावे दर्शन घेताना मान हरपते. पावसाळ्यात मंदिरासभोवती कोसळणाऱ्या जलधारा सिध्देश्वरास जलाभिषेक घालण्यासाठीच धावत येतात, असे वाटते. पाऊस नसल्यावर पाण्याच्या ओहोळाच्या खुणा येथील भव्यता डोळ्यासमोर उभी करतात. मंदिरामागे पाण्याचे मोठे कुंड आहे. पाराशर ऋषींना भगवान शिवाचे दर्शन झाल्यावर याच कुंडामधून गंगा प्रकट झाली, असे सांगितले जाते.

पारनेरमधील बारा ज्योतिर्लिंग दर्शनाची एक दिवसीय यात्रा श्रावण महिन्यात आपल्या सोयीने सहकुटूंब करून शिवदर्शनासह निसर्गात रहाण्याचा निसर्गाशी समरस होण्याचा आनंद लुटावा.

– मिलिंद सदाशिव चवंडके, मो. ९४२२४९५२८९
नगर जिल्हा इतिहास संशोधक मंडळ कार्याध्यक्ष

राष्ट्रप्रेमाने ओतप्रोत नगर शहराची वैचारिक चळवळ

पं. दीनदयाळ व्याख्यानमाला

ज्या समाजात वैचारिकदृष्ट्या जागृती असते, जेथे विचारांत राष्ट्रप्रेम, समाजभान आणि चांगुलपणा असतो तेथे सर्वांगिण विकासाला पोषक वातावरण लाभते आणि त्यातूनच त्या शहराची गुणवत्तापूर्वक वाढ होणे शक्य असते.

आपण पुण्याला विद्येचे माहेरघर म्हणतो (होतो?) नाशिक, सातारा, नागपूर, कोल्हापूर यांनीही मोठी प्रगती केली. यात तेथील उद्योजक, राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक नेतृत्वासह नागरिकांचा कृतीपूर्ण विचारांचा मोठा सहभाग होता व आहे.

आता आपल्या शहराविषयी बोलू या. आपण सगळे सहजच बोलून जातो. आपलं शहर मोठं खेडं आहे. अहाण नही सुधरणर! पण आपण स्वतः गप्पांचा फड करण्यापलिकडे काही करतो का? विधायक कामांकरिता, समस्या निवारणासाठी शासन, प्रशासन किंवा संबंधितांना जाब विचारतो का? आंदोलन, मोर्चे इ. करतो का?

एवढं सगळं सांगायचं कारण म्हणजे आपण एक नागरिक म्हणून काही कर्तव्यं खरंच करतोय का? आणि त्यासाठी आपली भावनिक, वैचारिक बैठक आहे का?

याच दृष्टिकोनातून वाटते की दीनदयाळ परिवाराचे संस्थापक व शहरासाठी, राष्ट्रप्रेमाच्या व कट्टर हिंदू संस्कृतीच्या प्रेमापोटी धडपडणारे वसंत लोढा यांनी चर्चा, प्रबोधन व वैचारिक चळवळीसाठी पं. दीनदयाळ व्याख्यानमाला चालू केली.

पं. दीनदयाळ यांच्या म्हणे 'मैं अपने लिए नहीं, अपनों के लिए हूँ' या तत्त्वानुसार त्यांनी दीनदयाळ परिवाराची स्थापना करतांनाच सर्वसामान्यांसाठी पतसंस्थाही सुरू केली व वाढवली. खरं तर वैचारिकदृष्ट्या नागरिक, समाज सक्षम, नीडर असणं आवश्यक असते या भावनेतून राष्ट्रीय स्तरावरील वक्ते, नेते व समाजहितैषिंना व्याख्यानमालेत आणुन त्यांनी एक वशस्वी व गरज असणारी चळवळ उभारली आहे.

प्रत्येकाचे मत, विचार वेगवेगळे असू शकते. विविधता हा तर आम्हां भारतीयांचे वैशिष्ट्य! तरीपण सर्वप्रथम देश व देशाभिमान योग्यच नाही का?

नागरकरांना या वैचारिक आंदोलनात सहभागी करून घेण्यासाठी या व्याख्यानमालेने मोलाचा वाटा उचललाय. या दीनदयाळ व्याख्यानमालेविषयी, नागरला जैन सोशल फेडरेशनची 'महावीर व्याख्यानमाला', बनवासी कल्याण आश्रम संचलित 'ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमाला', गिंगारला चालणारी 'स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला' यांचाही अनेक वर्षांपासून वैचारिक आंदोलनात मोठा वाटा, सहभाग आहे. यासाठी संयोजक वसंत लोढा, पतसंस्था कर्मचारी व्यापारी, उद्योजक यांचा मोठा सहभाग आहे. यासाठी संयोजक वसंत लोढा, पतसंस्था कर्मचारी आर्थिक, औद्योगिक क्षेत्रातील नामवंतांनी आपल्या विचारांचं सोनं अन् अनुभवाची शिदोरी आपल्याला दिली. यात प्रामुख्याने केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान, स्टार्टअप तज्ञ ऋषी भटनागर, श्याम जाजू, मनजितसिंग बिट्टा, ॲड. उज्वल निकम, अनिल बोकिल, सुब्रह्मण्य स्वामी, भाऊ तोरसेकर (पत्रकार), रजत शर्मा, कृष्णप्रकाश, विक्रास नांगरे इ. यांनी अनमोल विचार साहित्य.

यावर्षी केरळ स्टोरी अनुभवणारी प्रत्यक्ष नायिका ॲ. श्रुती, सनातनचे जागतिक प्रचारक श्री. आर. मनोज, माजी पोलिस महासंचालक ख्रा.डॉ. सत्यपाल सिंह, तेलगू चित्रपट अभिनेत्री हैद्राबाद फेम माधवी लता, ज्योष पत्रकार व भविष्यातील आव्हानांचा वेध घेणारे पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांच्या अनुभवसंपन्न विचारांना ऐकण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

तर संवेदनशील नागरकरांनो या व्याख्यानमालेतील विचारांचे चिंतन, मनन करून आपणही या चळवळीत सामील होऊन शहरासह राष्ट्रीय वैचारिक व सर्वांगिण प्रगतीत सहभागी व्हावे हीच प्रामाणिक अपेक्षा. आपल्या क्रिया, प्रतिक्रिया देऊन तन, मन, धनाने कार्य करणाऱ्यांना पाठिंबा हा ही अपेक्षा.

– दिशान फिचर्स

पंडीत दीनदयाळ पतसंस्था व परिवारातर्फे नगरमध्ये निबंध स्पर्धा

नगर – ३०,३१ ऑगस्ट व १,२ सप्टेंबर रोजी पंडीत दीनदयाळ व्याख्यानमाला, माऊली सभागृह, झोपडी कॅन्टीन, अ.नगर येथे आयोजित करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने पुरुषांच तिनही दिवशी देशातील प्रख्यात असे वक्ते आमंत्रित केलेले आहेत. तरी या चारही दिवशी उपस्थित राहणाया ९ वी ते १२ वी व महाविद्यालयीन, खुल्या युवा व प्रौढ व्यक्ती तीन ही दिवस व्याख्यानमालेस श्रोते म्हणुन उपस्थित राहणाऱ्यांसाठी चारही दिवस झालेल्या व्याख्यानांच्या विषया पैकी कोणत्याही एक झालेल्या विषयावर पंडित दीनदयाळ पतसंस्था व दीनदयाळ परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने पंडीत दीनदयाळ निंबध स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

स्पर्धेचे गट पुढीलप्रमाणे– पुरस्कार (प्रत्येक गटास) गट क्र.१ (९ वी ते १२ वी), गट क्र. २– (महाविद्यालयीन), गट क्र.३ (खुला गट) पुरस्काराचे स्वरूप प्रथम – ५,००१, द्वितीय –३,००१ तृतीय – २,००१ तसेच स्पर्धेत सहभागी होणाया प्रत्येक स्पर्धकाला प्रशस्तीपत्र देण्यात येईल. स्पर्धेबाबत माहितीसाठी – ९७६४५००५००, ७०४०० ३००७४, ९१३०८४५५५०, ८२०८३ ०८२३३. नागरकरांनी सहभागी होण्याचे आवाहन पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन वसंत लोढा, परिवाराचे अध्यक्ष धनंजय तागडे, महासचिव बाळासाहेब भुजबळ, प्राचार्य सुनिल पंडीत, निबंध स्पर्धा समितीचे अभिषेक दायमा, ऋदेश अंबाडे, प्रा.अमोल खाडे यांनी केले आहे.

बाई इचरजबाई प्रशालेत दहीहंडी उत्सव साजरा

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेच्या प्रांगणात दहीहंडी उत्सव मोठया उत्साहात पार पडला. कब बुलबुल पथकातील विद्यार्थ्यांसह शालेय विद्यार्थ्यांनी दहीहंडी उत्सवाचा आनंद लुटला.

संस्थेच्या प्रमुख कार्यवाहक छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया मार्गदर्शनाखाली दहिहंडी उत्सव पार पडला. शालेच्या प्रांगणात दहीहंडीसाठी सजावट करण्यात आली होती. शालेच्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णजन्माष्टमीच्या पार्श्वभुमीवर गीत व नृत्य सादर केले. संगीत शिक्षिकेने श्रीकृष्णावर आधारित सामुहिक गीत गायन घेतले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला या सणाचे महत्त्व सांगितले. त्यानंतर कब बुलबुल पथकासह विद्यार्थ्यांनी उंच मनोरे रचून सूर – तालांच्या गजरात दहीहंडी फोडली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया बालवाडी इन्चार्ज वनिता चौधरी, वर्षा चिखले, सविता शेळके, विशाल तांदळे, शकुंतला देसर्डा, पराग विलायते, वैशाली निकम, पूजा कराळे, शरद कातोरे, वैभव वाघ, कांचन वाघ, प्रसाद शिंदे, कांतीलाल खुरांगे यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी बालवाडी विभागानेही विशेष परिश्रम घेतले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेच्या प्रांगणात दहीहंडी उत्सवात विद्यार्थ्यांनी उंच मनोरे करून दहीहंडी फोडली.

उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता हे आयएमएसचे वैशिष्ट्य

डॉ. एम. बी. मेहता यांचे प्रतिपादन; आयएमएसमध्ये एमबीए व एमसीए प्रवेश प्रक्रियेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

नगर – महाराष्ट्र शासनाच्या सीईटी विभागाच्या वतीने सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील एम.बी.ए. व एम. सी. ए. या दोन वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. दोन्ही अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी आयएमएस संस्थेला पसंती देत आहेत. उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता संस्थेचे वैशिष्ट्ये असून त्यामुळेच विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद आहे, असे प्रतिपादन संस्थेचे संचालक डॉ. एम.बी. मेहता यांनी केले. संस्थेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत प्रशासन विभागाच्या वतीने करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, संस्थेच्या ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस, कार्यालयीन अधिक्षिका शरयू कुलकर्णी, लेखापाल नरेंद्र कदम, शुभांगी येळीकर, अनुश्री गुगेकर, महेश दिक्षीत, सी.डी. मोहिते, दिपक तुंगार व इतर सदस्य उपस्थित होते.

आय.एम.एस.मध्ये एम.बी.ए. व एम.सी.ए. प्रवेश प्रक्रियेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. याप्रसंगी विद्यार्थ्यांचे स्वागत करताना संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता आदी.

शासनाच्या निवड प्रक्रियेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ही प्रवेश प्रक्रिया सोपी व्हावी म्हणून ऑनलाईन पध्दतीने सर्व सोपस्कर राबविले जातात. प्रवेश प्रक्रियेचा फॉर्म भरण्यापासून फी भरे पर्यंत सर्व सुविधा ऑनलाईन आहेत. ह्ि प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रशासन विभागाच्या वतीने प्रक्रिया पूर्ण झाल्याचे अभिनंदनाचे पत्र, पुष्प व कॉलेज साठी रोज वापरता येईल अशी बॅग देऊन मुलांचे स्वागत केले जाते.

तसेच प्रशासन विभागातील कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांसाठी एक हेण्डमाऊट तयार केले आहे, जे त्यांच्या शैक्षणिक कार्यक्रालात काय करावे आणि काय करू नये याबाबत मार्गदर्शक सूचना देणारे असे आहे. शिष्यवृत्तीच्या औपचारिकतेची माहिती देणारा एक क्यूआर कोड देखील प्रशासन विभागाच्या वतीने तयार केला आहे. हया दोन्ही गोष्टी विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर आहेत. प्रवेशाचे विविध टप्पे पार करून प्रवेश झाल्यावर प्रशासन विभागाच्या वतीने केलेल्या या अभिनव स्वागताने मुलांना देखील संस्थेविषयी आपुलकीची भावना निर्माण झाल्याची प्रतिक्रिया विद्यार्थी देतात.

आय. एम. एस. मध्ये उच्च दर्जाचे शिक्षण, उत्तम कंपन्यांसोबत असणारे संबंध, यामुळे नोकरीच्या भरपूर संधी मुलांसाठी उपलब्ध आहेत. त्यामुळेच आय. एम. एस. संस्थेला मुलांचा प्राधान्यक्रम असल्याचे डॉ. विक्रम बार्नबस यांनी सांगितले.

शहरातील सर्जेपुरा भागातील राधाकृष्ण मंदिरात दहिहंडी फोडताना चिमुकले. दुसऱ्या छायाचित्रात विविध वेशभूषेतील बालगोपाळ आपल्या पालकांसमवेत दहिहंडीचा आनंद लुटताना.

शहरातील राधाकृष्ण मंदिरात चिमुकल्यांनी फोडली दहीहंडी

श्रीकृष्ण जन्मोत्सव भक्तीभावाने साजरा, भजन व भक्तीगीतांमध्ये भाविक रमणाग

नगर – शहराच्या सर्जेपुरा येथील पंजाबी सनातन धर्मसभेचे राधाकृष्ण मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात पार पडला. मंगळवारी (दि.२७ ऑगस्ट) श्रीकृष्णच्या वेशभूषेत आलेल्या बालगोपालांनी दहीहंडी फोडून गोपाळकाला साजरा केला. हदीहंडी फुटताच हाथी घोडा पालखी.. जय कन्हैया लाल की! च्या जयघोषाने मंदिर परिसर दणाणून निघाला. राधा व श्रीकृष्णच्या वेशभूषेत अवतरलेल्या चिमुकल्या मुला-मुलींनी सर्वांचे लक्ष वेधले.

सोमवारी (दि.२६ ऑगस्ट) मध्यरात्री १२ वाजता मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव भक्तीभावाने साजरा करण्यात आला. पाळणा हलवून श्रीकृष्णची आरती करण्यात आली. सजवलेल्या पाळण्यात भगवान श्रीकृष्णची प्रतिमा ठेवण्यात आली होती. यावेळी शहरातील भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. युगल शरण महाराजांच्या मधुर वाणीत श्रीकृष्ण भजन व रासलीलेचा आनंद भाविकांनी लुटला. विविध भक्ती गीतांमधून श्रीकृष्ण लिलाचे वर्णन यावेळी करण्यात आले. राधे राधे...., मुड मुड के देखा मुखडा तेरा..., सर झुका हे, सर झुकेगा आप के दरबार मे..., ओम जय जगदीश हरे... आदी एकाहून एक सरस भक्तीगीतांचे यावेळी सादरीकरण करण्यात आले. राधा-कृष्णवर भक्तीगीतांनी बहरलेल्या कार्यक्रमात भाविकांनी देखील ठेका धरला होता. भजनाने वातावरण भक्तिमय बनले होते. यावेळी शीख, पंजाबी समाज बांधवांसह महिला उपस्थित होत्या.

मंगळवारी गोपाळकालानिमित्त लहान मुलांसाठी श्रीकृष्ण-राधा यांची वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये चिमुकल्या मुलांना श्रीकृष्ण-राधा बनवून पालकांनी आनले होते. या स्पर्धेतील सर्व सहभागी मुला-मुलींचा मंदिराच्या वतीने सन्मान करण्यात आला. ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या धार्मिक सोहळ्यासाठी ट्रस्टचे सर्व विश्वस्त व समाजबांधव उपस्थित होते. दुपारी महाआरतीनंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

ज्ञानसंपदा शाळेत दहीहंडी उत्सव

दहावीच्या विद्यार्थ्यांनी नियोजनबद्ध थर रचत फोडली दहीहंडी

नगर – आपल्या भारतीय संस्कृतीची रुजवणूक व्हावी, तसेच विद्यार्थ्यांना सांस्कृतिक परंपरा जोपासता यावी, त्यांच्यामध्ये सामाजिक ऐक्य वृद्धिंगत व्हावे त्यांना विविध मूल्यांची शिकवण व्हावी यासाठी तपोवन रोडवरील ज्ञानसंपदा शाळेत नेहमीच विविध उपक्रम राबवत असते, त्यातीलच एक दहीहंडी उत्सव, दरवर्षीप्रमाणे यावर्षी शाळेत दहीहंडी उत्सव व कृष्ण जन्माष्टमी उत्सव साजरा करण्यात आला.

गोविंदा गोपालाच्या जयघोषात शाळेचे वातावरण दुमदुमून गेले. एलकेजीचे विद्यार्थी श्रीकृष्णाच्या बालवेशभूषेत उपस्थित होते. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी नियोजनबद्ध थर रचत दहीहंडी फोडून एकच जल्लोष केला. (छाया – उदय जोशी)

गोविंदा गोपालाच्या जयघोषात तपोवनरोडवरील ज्ञानसंपदा शाळेत दहीहंडी उत्सव व कृष्ण जन्माष्टमी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी नियोजनबद्ध थर रचत दहीहंडी फोडून एकच जल्लोष केला. (छाया – उदय जोशी)

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

दिल्लीगेटला जिव्हेश्वर महोत्सवाची महाप्रसादाने सांगता

दिल्लीगेटला जिव्हेश्वर महोत्सवाची महाप्रसादाने सांगता

नगर – साळी समाजाचे आराध्य दैवत असलेल्या भगवान जिव्हेश्वर यांच्या जन्मोत्सवानिमित्त दिल्लीगेट येथील भगवान जिव्हेश्वर मंदिरात आयोजित केलेल्या महोत्सवाची सांगता महाप्रसादाने झाली.

यावेळी पाहुण्यांच्या हस्ते भगवान जिव्हेश्वरांची महाआरती करण्यात आली. यावेळी प्रथम महापौर भगवान कुलसौंदर,बाळासाहेब बोराटे, संजय गेनप्पा, सचिन शिंदे, शाम नळकांडे, सोनाली चितळे, माजी महापौर अभिषेक कळमकर, अरविंद थिरके, संजय सामांवकर आदी उपस्थित होते

मंडळाचे संस्थापक संजय सामावकर, नितीन पावले, सागर सावेकर, सचिन पावले, निरज सामावकर, अथर्वा गलमुंढे, ओम सामावकर, प्रणव गळमुंढे, सचिन दिवटे, शैला मानकर, वनिता मानकर, कल्याणी पावले, विद्या मानकर, शीतल सगावकर, अनिता मानकर, अनिता सवई, रुपाली टोपले, लता सामावकर, मीना क्षीरसागर, माधुरी मानकर, मुकुंद सावेकर, संतोष सावेकर, प्रफुल मानकर, अनिल सावेकर, रमेश मुसळे, मनिषा खडामकर, महेश सामावकर, राम काळे, निलेश मानकर, ऋषी कळव आदींनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले

किशोर डागवाले यांचे राजकीय व सामाजिक कार्यात मोठे योगदान

दशरथ कुळधरण यांचे प्रतिपादन ; पुणे येथे 'महात्मा फुले पुरस्कारा'ने गौरव

पुणे येथे सकल सकल माळी समाज ट्रस्टचे अध्यक्ष किशोर डागवाले यांना महात्मा फुले पुरस्काराने गौरविण्यात आले. याप्रसंगी सावित्री शक्तीपीठाचे महाराष्ट्राचे संस्थापक अध्यक्ष दशरथ कुळधरण, के.एस.माळी, शिवबरंट महिला मंडळाचे संस्थापक सौ.आशाताई डागवाले, सकल माळी समाज ट्रस्टचे पदाधिकारी आदी.

पुणे – संत सावता महाराजांचा श्रमप्रतिष्ठेचा संदेश महात्मा फुले यांची समतेची ज्योत, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची शिक्षणाची शिदोरी घेऊन माळी समाज वाटचाल करीत आहे. किशोर डागवाले यांच्या अध्यक्षतेखाली सकल माळी समाज ट्रस्ट नगर शहरात उत्तम कार्य करीत आहे. संस्थेसाठी दोन एकर जागा मिळवून नगर शहरात समाजाच्या कामाची जी उभारणी होत आहे. हे महाराष्ट्रातील एकमेव उदाहरण ठरेल. सकल माळी समाज ट्रस्टने वधू वर सूचक मंडळाची स्थापना, तसेच उद्योजकांसाठी व समाजाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवीत आहेत. विवाह जमविणे ही समाजाची मोठी समस्या आहे. यासाठी नगरकरांनी पुढाकार घेतला आहे.समाजाचे प्रश्न घेऊन समाजाच्या मान्यवरांनी सोडविणे हे सकल माळी समाज असणे दाखवून दिले आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात माळी समाज व ओबीसी समाज एकत्र येत आहे. याचा आदर्श राज्यात उभा राहावा.किशोर डागवाले यांचे राजकीय व सामाजिक कार्यात मोठे योगदान आहे. असे प्रतिपादन सावित्री शक्तीपीठ महाराष्ट्राचे संस्थापक अध्यक्ष दशरथ कुळधरण यांनी केले आहे.

पुणे येथील सावित्रीबाई फुले स्मारक येथे सावित्री शक्तीपीठ महाराष्ट्र व माळी समाज प्रबोधिनी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने संत सावता महाराज यांच्या ७२९ व्या समाधी सोहळा निमित्त संत सावता महाराज समाजभूषण महात्मा फुले पुरस्कार माजी स्थायी समिती सभापती तथा सकल माळी समाज ट्रस्टचे अध्यक्ष किशोर डागवाले यांना देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी सावित्री शक्तीपाठ चे संस्थापक अध्यक्ष दशरथ कुळधरण, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.सुनिता शिंदे, राज्य अध्यक्ष अभिनेत्री अपूर्वा सोनार, सीए के एस माळी, सकल माळी समाज ट्रस्टचे सचिव राजेंद्र पडोळे, विश्वस्त डॉ.रणजीत सत्रे, कोअर कमिटी सदस्य अमोल भांबरकर, लवेश गोंधळे, रोहित पठारे, स्वींद्र विघाते, रोहन डागवाले, आदिनाथ जाधव, अँड. सुनील सूर्यवंशी, मनोज ससाणे, शाम गोरे, शिववरट महिला मंडळाचे संस्थापक सौ.आशाताई डागवाले, सौ.चित्रा जाधव, सौ.भार्गवी डागवाले, सौ. अनुजा डागवाले, कु. अंकिता जाधव, कु.लक्षीका गवळी आदी उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना किशोर डागवाले म्हणाले, महाराष्ट्राच्या सावित्रीशक्ती पिठाच्या वतीने संत सावता महाराज समाजभूषण पुरस्कार मला दिला. हा सन्मान सर्व माळी समाजाचा व नगर शहरातील जनतेचा आहे.याची मुहूर्तमेढ सकल माळी समाज ट्रस्टच्या कार्यातून झाली आहे. मोठ्या प्रमाणात समाज एकत्रित येऊन समाजाच्या विकासासाठी महापालिकेकडून दोन एकरचा भूखंड मिळाला. या जागेवर महात्मा फुले व सावित्रीआई फुले यांचे स्मारक, हॉस्पिटल तसेच बहुउद्देशीय सभागृह, वस्तीगृह, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र उभारण्याचा मानस आहे. राजकीय व सामाजिक जीवनात खूप काम केले आहे.समाजाच्या कामात सकल माळी समाज ट्रस्टचे सर्व पदाधिकाऱ्यांनी साथ दिल्याने एकक एप्पा पार करत माळी समाज प्रगतीपथावर आहे.

सैंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी साजरी

नगर – तारकपूर येथील सैंट विवेकानंद इंग्लिश स्कूल मध्ये पूर्व प्राथमिक आणि इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडून गोकुळाष्टमी साजरी केली. श्रीकृष्ण जन्माचा देखावा, कालिया मर्दन, श्रीकृष्णाच्या बाललीला, रासलीला, गोविंद बोलो नृत्याविष्कार सादर करुन विद्यार्थ्यांनी जन्माष्टमीचा सुंदर कार्यक्रम सादर केला.

राधा आणि कृष्णाच्या वेशभूषा करुन विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. मटकी, बासरी आणि पंखांचे रंग, मिथक आणि दंतकथा यांच्या विविध प्रतिमांचे चित्रण करण्यात आले. उत्कृष्ट वेशभूषेसाठी आरोही हापसे आणि अद्वैत चिने यांना बक्षीस देण्यात आले. पूर्व प्राथमिकच्या बालगोपालांना शाळेतर्फे विश्वस्तांच्या हस्ते टिफ्या देण्यात आल्या.

मधुबन मे जो कन्हैया किसी गोपी से मिले या गाण्याच्या तालावर ऋतिका बत्तीन हिने नृत्य सादर केले. वर्गशिक्षिका प्रीती कटारिया, दीपा आहूजा, गुंजन पंजवानी ,कनन शेरवानी, अमृता चारमुंगे यांनी मार्गदर्शन केले.

अध्यक्ष राम मेघानी आणि विश्वस्त सुरेश हिरानंदानी यांनी बालगोपालांना कडेवर घेऊन दहीहंडी फोडण्यास मदत केली आणि अध्यक्षांनी सर्वांना या देशभर साजरा करणाऱ्या गोकुळाष्टमीच्या मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या आणि अंधारावर नेहमी सत्याचाच विजय होणार व असेच श्रीकृष्णाने भगवद्गीतेमध्ये सांगितल्याप्रमाणे वाग्ल्यास आपले आयुष्य आनंदी आणि सुखकर होईल असे त्यांच्या वक्तव्यात सांगितले.

तारकपूर येथील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी दहीहंडी फोडून गोकुळाष्टमी साजरी केली.

प्राचार्या कांचन पापडेजा म्हणाल्या की, जन्माष्टमी अंधाराचा अंत आणि वाईट शक्तींचा समूळ उच्चाटन करण्याचे प्रतीक म्हणून साजरी केली जाते. वाईटावर चांगल्याच्या विजयाचा संदेश देणारे भगवान श्रीकृष्णाच्या जन्माचे चित्रण करणारे विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट पद्धतीने सादर केले. आयुष्यात प्रत्येकाने आलेल्या क्षणांचा आनंद घेतला पाहिजे.

मुख्याध्यापिका गोदावरी कीर्तने यांनी हाथी घोडा पालखी जय कन्हैया लाल की हा जयघोष करत श्रीकृष्णाच्या जन्माची कथा जी विद्यार्थ्यांनी सादर केले ते अंगावर शहारे आणण्यासारखे होते आणि कालिया मर्दनाची गोष्ट मुलांना सांगून त्याचे महत्त्व मुलांना सांगितले.

कार्यक्रमानिमित्त बाळासाहेब गुंजाळ, मनीष लांडे यांनी आकर्षक फलक लेखन केले होते. संस्थेचे अध्यक्ष रामचंद मेघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सेक्रेटरी गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर मखिजा, ट्रस्टी सुरेश हिरानंदानी, महेश मध्यान, राजकुमार गुरुनानी, हरेश मध्यान, प्राचार्या गीता तांबे, उपप्राचार्य कांचन पापडेजा, मुख्याध्यापिका गोदावरी किर्तनी आदींनी विद्यार्थ्यांना जन्माष्टमीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी अबिनी देशपांडे, शुभांगी क्षीरसागर, प्रियंका चारगुंडी, अनामिका म्हस्के यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रत्येक पालकाने २९ ऑगस्ट रोजी गुड पॅरेंटींग परिसंवादात सहभागी व्हावे

उद्योजक उदय खिलारी

नगर – सध्याच्या धकाधकीच्या व डिजिटल युगात मुलांमधील व पालकांमधील सुसंवाद कमी होत चालला आहे. त्यामुळे घरातील वातावरण बिघडत आहे. लहान मुलं आई–वडिलांचे ऐकत नाहीत हट्टी झाली आहेत. अशा परिस्थितीत पालकांना पालकत्वाची भूमिका निभवतांना योग्य मार्गदर्शन होणे आवश्यक आहे. यासाठी पिढी सुसंस्कृत होण्यासाठी पालकांची भूमिका महत्त्वाची आहे. योग्य पालकत्वासाठी योग्य मार्गदर्शन होणे आवश्यक आहे. यासाठी रोटरी मिडटाऊन क्लबने गुड परेंटिंग परिसंवादाचे आयोजन करुन चांगला पुढाकार घेतला आहे. नगरमधील प्रत्येक पालकाने आपल्या पाल्यांच्या उज्वल भवितव्यासाठी गुड पॅरेंटिंग परिसंवादात सहभागी व्हावे, असे आवाहन उद्योजक उदय खिलारी यांनी केले आहे.

रोटरी क्लब मिडटाऊनच्या वतीने २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता सावेडी येथील माउली सभागृहात फक्त पालकांसाठी गुड पॅरेंटींग या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या परिसंवादात छत्रपती संभाजीनगर येथील व्याख्याते निलेश सुराणा हे सोप्या मराठी भाषेमधून पालकांना मार्गदर्शन करणार आहेत. सर्वांसाठी मोफत असलेल्या या कार्यक्रमास जास्तीत जास्त पालकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन रोटरी क्लब मिडटाऊनचे अध्यक्ष अजय पिसुटे यांनी केले आहे.

या परिसंवादाच्या पासेस साठी ९३७३९७९६५४ व ९४२२२२८८१० येथे संपर्क साधावा. तसेच आयकॉन प्लस्मिक स्कूल स्टेशन रोड, अजय गॅस एजन्सी, आनंदऋषीजी हॉस्पिटल जवळ, दत्त मार्बल्स पुना रोड, कॅफे कट्टा प्रोफेसर कॉलनी चौक, रेडीओ सिटी ऑफिस प्रोफेसर कॉलनी चौक व पानसंबळ हॉस्पिटल भिस्तबाग रोड येथे पासेस् उपलब्ध आहेत.

दादा चौधरी विद्यालयात सखी सावित्री समितीची स्थापना

शाळा व्यवस्थापनाने मुलींच्या सुरक्षा संदर्भात उपाययोजना कराव्यात : शिक्षणाधिकारी अशोक कडूस

नगर – बदलापूर, ठाणे येथे छोट्या चिमकलीवर अत्याचार झाल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांनी दादा चौधरी विद्यालयातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी केली व मुलींच्या सुरक्षितेतसाठी केल्या उपाययोजनांची माहिती घेऊन समाधान व्यक्त केले. तसेच शाळेतील शिक्षकांची बैठक घेऊन त्यांना सूचना दिल्या.

शाळेतील शिक्षकांना मार्गदर्शन करताना श्री.कडूस म्हणाले, जिल्ह्यातील सर्व शाळांचे मुख्य गेट शाळा भरल्यापासून ते सुटेपर्यंत बंद असावे. विद्यालयामध्ये शालेय वेळेत येणारे पालक इतर शाळांमधील शिक्षक अभ्यासात यांच्यासाठी कामाचा तपशील येण्या जाण्याची वेळ आणि मोबाईल नंबर लिहिण्यासाठी रजिस्टर ठेवावे. शासकीय परिपत्रकाप्रमाणे सखी सावित्री समिती स्थापन करून शाळा व्यवस्थापनाने मुलींच्या सुरक्षा संदर्भात योग्य ती खबरदारी घ्यावी, असे सांगितले.

दादा चौधरी विद्यालयात सीसीटीव्ही कॅमेऱ्याची पाहणी करताना माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस. समवेत विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई, मुख्याध्यापिका कु.सुनीता जामगावकर. (छाया – अमोल भांबरकर)

हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी विद्यालयांमध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या असणाऱ्या तक्रारींसाठी तक्रार पेटीचे उद्घाटन माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांनी केले. याप्रसंगी दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनीता जामगावकर, मराठी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष येवले, गोविंद धर्माधिकारी, अजय महाजन, विलास नंदे, दीपक शिंदे, प्रसाद सामलेटी, प्रदीप भोसले, वर्षा गुंडू, श्रीमती ताटी, श्रीमती घोडे आदी उपस्थित होते.

चेअरमन अनंत देसाई म्हणाले, शाळा व्यवस्थापन मुलींच्या सुरक्षेसाठी विशेष काळजी घेत आहे. बदलापूरची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या घटना घडू नये, यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

मुख्याध्यापिका कु.सुनीता जामगावकर यांनी आभार मानले.

अभिनेत्री जेनेलिया देशमुख यांना देण्यात आली राजयोगाची पुस्तके भेट

अभिनेत्री जेनेलिया देशमुख अहमदनगर मध्ये आल्या असताना प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या द्वारे जगभरात १४३ देशात शिकविल्या जाणाऱ्या भारताच्या प्राचीन राजयोगाची पुस्तके ब्रह्माकुमारी सुप्रभा दीदी यांच्या हस्ते भेट देण्यात आली. यावेळी ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते त्यांना सुविचारांची फ्रेम भेट देण्यात आली व संस्थेचे आंतरराष्ट्रीय मुख्यालय माउंट आबू भेटीचे निमंत्रण दिले.

विनाअनुदानित शिक्षकांसाठी नगरमध्ये १ सप्टेंबर रोजी चर्चासत्राचे आयोजन

नगर – राज्यातील शिक्षण क्षेत्रात विनाअनुदान तत्वावर कार्यरत असणार्या शिक्षण संस्थांची संख्या मोठी आहे. येथे काम करणारे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि शासन अनुदानित संस्थांतील कर्मचारी यांचे काम सारखाच आहे. मात्र वेतनात प्रचंड तफावत आहे. विनाअनुदानित संस्थांतील कर्मचाऱ्यांना अतिशय कमी पगारात काम करावे लागते. या महत्वाच्या समस्येसह कर्मचाऱ्यांना आणखीही समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. यावर चर्चा करण्याच्या उद्देशाने विनाअनुदानित शिक्षणव्यवस्था न्याय व हक्क परिषदेच्यावतीने भव्य चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

अहमदनगर शहरातील माऊली सभागृहात १ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ यावेळेत चर्चासत्र होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड व लखनऊ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष डॉ. एस. पी. लवांडे, मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष रावसाहेब क्षेत्रे, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे, डॉ. प्रमोद तांबे आदी उपस्थित राहणार आहेत. या परिषदेला विनाअनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन परिषदेचे आयोजक सुदाम लगड यांनी केले आहे.

जाहीर ब–१ निविदा नोटीस

प्रारुपंकायत बडगांव लांडगा, ता. संगमनेर, जि. अहमदनगर यांच्याकडून जाहिर निविदा नोटीसद्वारे कळविण्यात येते की, प्रारुपंचायत बडगांव लांडगा, ता. संगमनेर अंतर्गत खालील काम वरुपयासाठी दोन सिलबंद लिफाफ्यात ब–१ निविदा मागवण्यात येत आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	योजनेचे नाव	निविदा रक्कम	निविदा फी	बयाना रक्कम	कामाची मुदत	ठेकेदाराचा प्रवर्ग
१	गौरव बडगांव लांडगा ता.संगमनेर येथील अंतर्गत रस्ता दुरुस्ती करणे.	१५ वा वित्त आयोग ज.म. स्तर सन २०२४–२५	२१४९६५/–	२३६/–	१%	३ महिने	खुला

निविदा फॉर्म व कागदपत्रा शर्ती व अटी वाचावयाची माहिती सां.वे. कार्यालयात दि. २८/०८/२०२४ ते ०३/०९/२०२४ या कालावधीत कार्यालयात वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. निविदाद्वि निविदा दि. ०३/०९/२०२४ रोजी सायं. ५ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा शनवारी दि. ०४/०९/२०२४ / बारिक बैठक रोजी सकाळी ११ वा. उपस्थितात येतील. निविदा मंजूर–नामंजूर करण्याचा अधिकार प्रारुपंचायत बडगांव लांडगा, ता. संगमनेर ने राखून ठेवला आहे. आवश्यक प्रमाणपत्र :– १) फि.र. नोंदणी प्रमाणपत्र, २) पॅनकार्ड. ३) जी.एस.टी. प्रमाणपत्र, ४) आधारकार्ड, ५) सलग्नप्रतिज्ञापत्र

प्रारुपंसेवक/सरपंच
ग्रा.पं. बडगांव लांडगा, ता. संगमनेर, जि. अहमदनगर

जाहीर ब–१ निविदा नोटीस

प्रारुपंचायत बोरबन, ता. संगमनेर, जि. अहमदनगर यांच्याकडून जाहिर निविदा नोटीसद्वारे कळविण्यात येते की, प्रारुपंचायत बोरबन, ता. संगमनेर अंतर्गत खालील काम वरुपयासाठी दोन सिलबंद लिफाफ्यात ब–१ निविदा मागवण्यात येत आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	योजनेचे नाव	निविदा रक्कम	निविदा फी	बयाना रक्कम	कामाची मुदत	ठेकेदाराचा प्रवर्ग
१	गौरव बोरबन ता.संगमनेर येथे सरदी ते कारजन वस्ती रस्ता करणे.	१५ वा वित्त आयोग २०२१–२२	२८२९२१/–	१००/–	२६२१/–	३ महिने	खुला

निविदा फॉर्म व कागदपत्रा शर्ती व अटी वाचावयाची माहिती सां.वे. कार्यालयात दि. २८/०८/२०२४ ते ०३/०९/२०२४ या कालावधीत कार्यालयात वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. निविदाद्वि निविदा दि. ०३/०९/२०२४ रोजी सायं. ५ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा शनवारी ०४/०९/२०२४ रोजी सकाळी ११ वा. उपस्थितात येतील. निविदा मंजूर–नामंजूर करण्याचा अधिकार प्रारुपंचायत बोरबन, ता. संगमनेर ने राखून ठेवला आहे. आवश्यक प्रमाणपत्र :– १) फि.र. नोंदणी प्रमाणपत्र, २) पॅनकार्ड. ३) जी.एस.टी. प्रमाणपत्र, ४) आधारकार्ड, ५) सलग्नप्रतिज्ञापत्र

प्रारुपंसेवक/सरपंच
ग्रा.पं. बोरबन, ता. संगमनेर, जि. अहमदनगर

मी अनुभवलेलं, 'पुष्प' वलय...

बँकेच्या संस्थापक संचालिका मा.अध्यक्षा प्रा.कै.सौ.पुष्पलता एकनाथ वाघ यांना भावपूर्ण आदरांजली...

मा. संचालिका मंडळाने माझ्यावर विश्वास टाकून ऑगस्ट २००२ मध्ये बँकेच्या व्यवस्थापक पदाची जबाबदारी दिली. तेव्हा मला बँकेचा परिसर, सभासद, ग्राहक नवीन होते. दैनंदिन कामकाज करत असताना अडचणी येत होत्या तेव्हापासून बँकेच्या ज्येष्ठ संचालिका व मा. अध्यक्षा कै.प्रा.सौ पुष्पलता एकनाथ वाघ यांनी शेवटच्या क्षणापर्यंत मला मार्गदर्शन केले.

बँकेची स्थापना आणि बँक व्यवसाय व तिच्या लौकिक वाढवण्यामध्ये वाघ मॅडम यांचे मोलाचे योगदान आहे. बँकेचे कामकाजामध्ये त्यांनी अतिशय अभ्यासपूर्वक आणि प्रखरपणे कायम सहभाग घेतला. त्यांचे बँकेच्या सर्व विषयावरती बारीक लक्ष असायचे. बँकेच्या व्यवसाय वाढ, आधुनिक ग्राहक सेवा, कर्ज वितरण वसुली इत्यादी विषय त्यांच्या आवडीचे होते. कोणताही कर्ज प्रस्ताव घेऊन येणारा कर्जदार त्यांचा परिचय नाही असे होत नव्हते. कर्ज वसुली त्यांचा आवडीचा विषय होता. कर्ज वसुली हा बँकेचा कणा आहे हे त्यांनी ओळखले होते. संस्थापिका प्रा. मेघाताई काळे, प्रा. पुष्पा मरकड आणि प्रा पुष्पलता वाघ यांची कर्ज वसुली समिती तरलेली. कर्ज वसुली बाबत त्यांचा करारीबाणा अधिकारी व प्रत्येक कर्जदार यांनी अनुभवला आहे, त्यामुळे बँकेचे नक्त एनपीए शून्य टक्के राखण्यात बँकेस कायम यश आलेले आहे. वाघ मॅडम यांचा बँकेचे सर्व सभासद, ग्राहक, संचालिका मंडळ, कर्मचारी यांचे बरोबर उत्तम समन्वय होता, त्या सर्वांमध्ये प्रिय होत्या.

प्राध्यापक वाघ मॅडम यांनी १९६६ पासून जिल्हा परिशद प्रसारक समाज या संस्थेमध्ये मनापासून अध्यापनाचे कामकाज केले त्यांनी असंख्य विद्यार्थी घडवले, शैक्षणिक कार्यक्रमात सहभाग घेतला. माझी आई, माझे विद्यालय आशा अनेक सांस्कृतिक कार्यक्रमा सहभाग घेतला. त्यांना शैक्षणिक क्षेत्रात अनेक सन्मान प्राप्त झाले. त्यांच्यासोबत व्यवसाय पहाणे अथवा कर्ज वसुलीसाठी जात असताना समोरून येणाऱ्या अणोळखी युवकांनी मॅडमला नमस्कार करून मॅडम माझा इथे मोठा व्यवसाय आहे, मी उच्च पदावर अधिकारी म्हणून काम करतो आहे, मी उद्योजक आहे, माझा व्यवसाय चांगला चाललेला आहे. मॅडम तुम्ही मला शिकवायला हाता, असे असंख्य विद्यार्थ्यां मॅडमच्या मनापासून आदर करतात, तेव्हा अभिमानाने उर भरून येतो त्यांचे हे कार्य अनमोल आहे त्यांना शैक्षणिक कार्यात अनेक सन्मान प्राप्त झालेले आहेत.

त्यांच्या सोबतचा प्रवास अस्परणीय आहे. सहकार परिषद, प्रशिक्षण, असोसिएशन, फेडरेशन येथे बँकेच्या कामानिमित्त किंवा केव्हा कधी प्रवास होत असेल तेव्हा शक्यतो संचालक मंडळ सोबत असते. प्रवासाला निघण्यापासून परत येईपर्यंत संवाद, गाणी, भजन, गवळण, जोक इत्यादी मूळे प्रवास कधी होते ते काळात नाही. मन प्रसन्न होते. त्यांची स्वत:ची काव्य 'साठाव वर्षस थोवयांच, प्रा. मरकड मॅडमसाठी गेला मोहन कुणीकडे हे गीत झाले नाही, असे कधी होत नाही.

बँकेत सेवेत रुजू झाल्यापूर्वी कुटुंबापासून मी खूप काळ दूर राहिलेनो नव्हतो त्यामुळे माझ्या आईला खूप काळजी वाटत असे. ज्येष्ठ संचालिका समवेत वाघ मॅडम माझ्या आईला भेटायला आल्या होत्या. आई म्हणाली हा माझा सर्वात लहान मुलगा आहे. त्याला सांभाळा त्यावर सर्वांनी माझा आईस जो विश्वास दिला त्यानंतर आईने माझी कधीही काळजी केले नाही. वाघ मॅडम माझ्या आई व कुटुंबाची नेहमी विचारपूस करत असत. कामानिमित्त अथवा मॅडमला भेटायला गेल्यानंतर मॅडम व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी चहापान आणि काही तरी खाद्यपाशिवाय परत कधी येऊ दिले नाही. मॅडम आजारी असताना भेटीसाठी गेलो असता त्यांनी स्वत:चे दिलेले स्वत:चे शेतातील आंबे हे कायम स्मरणात राहतील, यावरुन त्यांनी त्यांच्या कुटुंबावर केलेल्या संस्कारांची प्रचिती येते.

त्यांचे प्रत्येक कर्मचाऱ्यावर विशेष लक्ष असायचे, कर्मचाऱ्याच्या अडीअडचणी, त्यांचे प्रश्न सोडवण्यात मॅडम कायम आग्रही असायचा. त्यांचा मायाळू स्वभाव तितकच कडक शिस्तीचा त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये त्यांचा आदरयुक्त दरारा होता. त्या कर्मचार्यांच्या कायम हृदयात राहिलेले आहेत.

आज बँकेचे २५०००० हून जास्त ग्राहक आहेत. बँकेचा एकूण निश्च व्यवसाय रु १६७ कोटीचा आहे. नक्त एन.पी.ए० टक्के आहे. बँकेचा सी.आर.ए.आर २३.१५ टक्के आहे. बँकेस नियमित ऑडिट अ वर्ग मिळत आहे. बँकेने मोबाईल, यु.पी. आय, फोन पे, गुगल पे, आय.एम.पी.एस इत्यादी डिजिटल ट्रांजेक्शनचे सर्व सेवा सुरु केलेले आहेत. बँकेची पाचवी शाखा चालू झालेले आहे. यामध्ये वाघ मॅडम यांचा मोलाचा वाटा आहे त्या बँकेच्या संस्थापक संचालिका असून एकूण चार वेळा त्यांनी अध्यक्षपद भूषवलेले आहे. त्या अहमदनगर बँक असोसिएशनच्या सदस्य म्हणून कामकाज केलेले आहे.

आमचा आधारवड वयाचे ७७ व्या वर्षी आम्हास पोरका करून गेला. त्यांच्या जाण्याने बँकिंग, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील न भरुन निघणार उणीव निर्माण झालेली आहे. त्यांच्या जाण्याने त्यांच्या कुटुंबावर आणि बँक परिवार यांच्यावर दु:खाचा मोठा डोंगर कोसळलेला आहे. त्यातून त्यांना सावरण्याची शक्ती परमेश्वराने द्यावी त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

– अंकुश गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी
दि अंबिका महिला सहकारी बँक लि., अहमदनगर

कॅलिडोस्कोप

अंगावरील ऐश्वर्य
आता उतरले खाली
जीर्ण पर्णांचा पाचोळा

विसावला वृक्षतळी
नव तुळूं ती पाने
कधी त्यांची छाया होती

कधले परेणारी
ओली त्यांची माया होती

जीर्ण पर्णांचा पाचोळा...

कोट, टाय, बूट घातलेला कुत्रा!

आपण अनेक्दा मॉल्सच्या अंगावर महागडे कपडे, बूट, हातात घड्याळ आणि गळ्यात टाय घातलेले पाहिले आहे; परंतु जिया ओपई नावाचा डॅचरमॅन कुत्रा वॉकिंग सूट-बूट घालून मॉलसारख्या वागतो. हा कुत्रा गेल्या एक वर्षापासून ऑनलाइन मॉडेलिंग करत आहे. तो इंटरनेटवर खूप लक्ष वेधून घेत आहे. मानवी कपडे आणि उपकरणे परिधान करून मॉडेल बनण्याची अनोखी क्षमता देखील त्याच्यात आहे. जिया ओपईचे फोटो आणि व्हिडिओ गेल्या वर्षभरापासून ऑनलाइन फिरत आहेत; परंतु कुत्र्याच्या मालकाबद्दल फारशी किंवा कोणतीही माहिती नाही. त्याचा मालक त्याला टाय आणि सूट बूट घालताना दिसत आहे. हा कुत्रा अतिशय स्वच्छ आणि श्रीमंत घराचा रक्षक असल्याचे दिसते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या सूट, बूट आणि पॅंटागनुळे कुत्र्याला कोणतीही अडचण येत नाही. कुत्र्याला मस्त रंगाचा शर्ट आणि काळा कोट घातलेला दिसतो. गळ्यात साखळी आणि हातात महागडे घड्याळ त्याचा लुक मॉडर्न बनवत आहे. सूट बूट घातलेल्या कुत्र्याच्या चेहऱ्यावर अभिमानाची भावना स्पष्टपणे दिसून येते.

'सोशल मीडिया'वर या कुत्र्याचे अनेक व्हिडिओ व्हायरल झाले. इतकेच नाही, तर लाखो लोकया कुत्र्याचे चाहते आहेत आणि त्याला फॉलोदेखील करत आहेत. जिया ओपई चीनमधील सर्वात लोकप्रिय शहरांपैकी एक असलेल्या चॉंगकिंग येथून आला आहे. 'वूफ वर्ल्ड' नावाच्या यूट्यूब चॅनलवरून या कुत्र्याचा व्हिडिओ शेअर करण्यात आला.

दगडातून येतो डमरूचा आवाज!

हिमाचल प्रदेशमध्ल्या सोलनमध्ये भगवान शंकरचं एक मंदिर आहे. शंकराला डमरू विशेष प्रिय आहे. म्हणूनच इथल्या दगडवर थाप मारल्यास डमरूसारखा आवाज येत असल्याचं म्हटलं जातं. जठोली शिव मंदिर या नावाने ते ओळखलं जातं. अत्यंत सुंदर असं हे मंदिर ११११ फूट उंच असून वास्तुकलेचा उत्तम नमुना आहे. पौराणिक काळात शंकराने याही काळ इथे वास्तव्य केल्याचं म्हटलं जातं. हे मंदिर बांधण्यासाठी जवळपास ४० वर्षं लागली. तसंच ते देशातिदेशातल्या भाविकांनी दिलेल्या दानातून उभारण्यात आलं आहे. या मंदिरात अनेक देवीदेवतांच्या मूर्ती पहायला मिळतात. मंदिराच्या गाभाऱ्यात स्फटिकमणी शिवलिंगाची स्थापना करण्यात आली आहे. तसंच शंकर आणि पार्वतीच्या मूर्तीही आहेत. मंदिर परिसरातल्या दगडांवर थाप मारल्यास डमरू वाजवल्यासारखा आवाज येतो, अशी इथल्या भाविकांची श्रद्धा आहे. म्हणूनच या ठिकाणी भाविक मोठ्या संख्येने येतात. निसर्गरम्य परिसरातलं हे मंदिर खूपच अनोखं आहे.

अशी आहे जीभ

जीभ म्हणजे आपली जिव्हा. जिभेवडे आपलं तसं दुर्लक्षच होतं. तिचीही थोडीफार काळजी घ्यावी लागते. पण आपण ती घेत नाही. तसं पहायला गेलं तर जिभेची कधीही लिलकीच रंजक आहे. माणूस जिभेशिवाय जगू शकतो. पण यामुळे जिभेचं महत्त्व तसूभरही कमी होत नाही. विविध पदार्थांच्या चवी जाणून घेण्यासाठी आपल्याला जिभेची गरज असते. त्यामुळे खवय्येगिरी करायची तर जीभ हवीच. जीभ विविध प्रकारची इतर कार्यही करते. जिभेच्या स्नायूला हाडंचा कोणताही आधार नसतो. म्हणजेच जिभेत कोणतंही हाड नसतं. म्हणून बऱ्याच्या लोकांना जिभेला कही हाड, असा प्रश्न विचारला जात असावा. हाड नसलेला जीभ हा शरीरातला एकमेव अवयव आहे. आपल्या जिभेवर चवीची जाणीव करत देणारे बरेच तंतू असतात. आपण हे तंतू सूक्ष्मदर्शकाखाली पाहू शकतो. अर्थात जिभेव्यतिरिक्त गालांच्या आत, ओठांवर तसंच तोंडाच्या वरच्या बाजूला तसंच जिभेच्या खालीही चवीची जाणीव करत देणारे तंतू असतात. चवीसाठी आपल्या तोंडात जवळपास दहा हजार तंतू असतात. त्यापैकी आठ हजार तंतू जीभेवर असतात तर उर्वरित तोंडातल्या इतर भागांमध्ये असतात. वेगवेगळ्या आंबट, गोड, तिखट, खारट, तुरट अशा चवीची जाणीव जीभ करत देते. चवींबाबत संवेदनशील असलेला आणि त्याच्या लहरी मेंदूपर्यंत पोहोचवणारा जीभ हा शरीरातला एकमेव अवयव.



जीभ हा शरीरातला अत्यंत संवेदनशील स्नायू, एवढंच नाही, तर जीभ कोरडी असेल तर चवीची जाणीव होत नाही.

'जाको राखे सैया मार सके ना कोई'

असे म्हटले जाते. म्हणजे देव रक्षण करतो त्याचे कोणीही नुकसान करू शकत नाही. जगात दररोज अनेक अपघात होतात आणि त्यामध्ये लोकांचा मृत्यू होतो. पण आजकल फ्रान्समधून एक घटना चर्चेत आली.

फ्रान्समधील ऑबरविलियर्समध्ये राहणाऱ्या चार वर्षांच्या एन्झोसोबत ही घटना घडली. अपार्टमेंटच्या १६व्या मजल्यावरून ४३ मीटर खाली पडूनही हा मुलगा पूर्णपणे सुरक्षित होता. त्याच्या अंगावर एक ओरखडादेखील पडला नाही आणि त्याला कोणतीही गंभीर दुखापत झाली नाही. मध्य फ्रान्समधील ऑबरविलियर्समध्ये एक उंच अपार्टमेंटच्या १६व्या मजल्यावरून एन्झो हा चार वर्षांचा ऑटिझम असलेला मुलगा पडला. तो खोलीत असताना बाल्कनीच्या त्याला रडताना ऐकले. तो पटकन त्याच्या बेडे गेले असता दार लॉक असल्याचे आढळले. असे यापूर्वी कधीही घडले नव्हते. पालकांना शंका आली, की त्याने चुकून स्वतःला आतमध्ये बंद तर केले नाही ना! त्यांनी दार तोडले. तोपर्यंत एन्झोने रडणे थांबवले होते आणि खोली रिकामी दिसत होती. ४३ मीटर अंतारावरून पडूनही त्याच्या पायावर फक्त एक लहान स्क्रॅच दिसत होते. एन्झो स्वतःहून पित्याना पाहून ते थक्क झाले.

कसवाने कधी केला ट्रेनचा वेग!

ट्रेन आणि कसव पूर्णपणे भिन्न प्रकार आहेत. दोन भिन्न वेगांची तुलना केली तर कसवाच्या वेगापेक्षा ट्रेनचा वेग कधी होतो. एक लहान कसव मोठ्या ट्रेनच्या वेगात अडथळा बनले आणि चालत्या ट्रेनच्या समोरच्या रुळांवर चालू लागले. रुळावर एक कसव आल्याने ट्रेनचा वेग थांबला.

लोकब्रिटिश ट्रेनमधून प्रवास करत होते; मात्र कसवामुळे यातील काही प्रवाशांना एस्कॉट ते बॅंगशॉट दरम्यान धावणाऱ्या ट्रेनला उशीर झाल्यामुळे तात्पुरता त्रास सहन करावा लागला. दक्षिण पश्चिम रेल्वेने एक ब्रिटीश मीडिया कंपनीला सांगितले, की ट्रेन चालवाना सोलोमन नावाचे कसव संध्याकाळी ६.३० नंतर एस्कॉट स्टेशनजवळ ट्रॅकवर दिसले. हे कसव बॅंगशॉटच्या दिशेने वेगाने जात असल्याचे त्यांनी गमतीने सांगितले. अभियंत्यांनी खूप प्रयत्नांनंतर त्या कसवाला बाहेर काढले. परिणामी, ट्रेन थोडी उशिराने निघाली. रेल्वे

कसवाच्या कसवाला पशुवैद्यकडे नेण्याचा विचार होता; मात्र कसवाच्या मालकने सोलोमन नावाच्या कसवाला ओळखले आणि रात्री आठच्या सुमारास त्याला त्याच्या घरी आणले. सोलोमन कसव घरातून पळून गेले होते. या घटनेत कसवाला कोणतीही हानी झाली नाही. रेल्वे सुविधांमध्ये कही काळ व्यत्यय आल्याचे दक्षिण पश्चिम रेल्वेने सांगितले. यासाठी रेल्वेने प्रवाशांची माफी मागितली. मालकच्या घराबाहेर असलेल्या कुंपणात दरी पडल्याने हे कसव घरातून पळून गेले आणि रेल्वे ट्रॅकवर पोहोचले.

सोळाव्या मजल्यावरून पडूनही जिवंत

गुलमर्गमधलं इग्लू कॅफे

हुडहुडी भरवणाऱ्या थंडीत एखाद्या कॅफेत बसून गरमागरम चहा किंवा कॉफीचे घोट घेण्यासारखा दुसरा आनंद नाही. सोबत भजी असेल तर उत्तमच. त्यातच हा कॅफे बर्फाचा असेल तर... कधी गंमत येईल ना! बर्फाच्या कॅफेमध्ये बसून चहा-कॉफी पिण्यासाठी आपल्याला परदेशात जाण्याची आवश्यकता नाही. वरण आपल्या नंदनवनात अनोखं इग्लू कॅफे सुरू झालं आहे. काश्मीर म्हणजे पृथ्वीवरचा स्वर्ग. गुलमर्ग हे या स्वर्गातलं खास आकर्षण. याच गुलमर्गमध्ये इग्लू कॅफे साकारण्यात आला आहे.

गुलमर्ग समुद्रसपाटीपासून २७३० मीटर उंचीवर आहे. वसीम शाह यांनी हे इग्लू तयार केलं आहे. काश्मीरला येणाऱ्या पर्यटकांना या इग्लू कॅफेची पुरळ पडली नसती तरच नवल. वसीम शाह स्वीट्झरलँडला गेले असताना तिथे अशा पद्धतीने अनेक कॅफे त्यांनी पहिले. काश्मीरमध्येही अशा पद्धतीचं एखादं कॅफे साकारण्याची कल्पना त्यांना सुचली आणि त्यांनी ती अमलातही आणली.

२२ लोकांनी अवघ्या १५ दिवसांत हे इग्लू कॅफे साकारलं. या कॅफेमध्ल टेबल, खुर्ची सगळं कही बर्फाचं आहे. या खुर्च्यांवर प्राण्यांच्या त्वचेपासून तयार करण्यात आलेली चादर घालण्यात आली आहे. इथे चार टेबल्स असून प्रत्येक टेबलावर चार माणसं बसू शकतात. म्हणजे या कॅफेमध्ये एक वेळी १६ माणसं बसू शकतात.

इग्लूच्या रचनेमुळे बाहेर थंडी असली तरी आत बऱ्यापैकी उब मिळते. म्हणजे बाहेरचं तापमान उणे दहा अंश असल्यास इग्लूच्या आतलं तापमान पाच ते दहा अंशांपर्यंत असतं. एवढ्या तापमानात बसून आपण निवांतपणे खाऊ शकतो. हे इग्लू कॅफे अगदी कमी कालावधीत लोकप्रिय झाले आहे. याचे फोटो सोशल मीडियावर पोस्ट केले जात आहेत. त्यामुळे या कॅफेला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. मार्चपर्यंत गुलमर्गमध्ये चांगलीच थंडी असते. त्यामुळे तोपर्यंत पर्यटकांना इग्लू कॅफेचा आनंद लुटता येणार आहे. या कॅफेमुळे गुलमर्गमध्ये पर्यटकांचा अधिक चालना मिळेल, अशी आशा वसिम यांना वाटते आहे. गुलमर्गच्या धर्तीवर इतर ठिकाणीही असे कॅफे सुरू करायला हवेत. म्हणजे पर्यटकांनाही अनोखा अनुभव घेता येईल.

हे जगतात पाण्याशिवाय



पाण्याशिवाय माणूस जगू शकत नाही. माणूसच काय तर अन्य कोणताही सजीव जगू शकत नसावा, प्रत्येकला कमी-अधिक प्रमाणात पाणी लागतंच. एक वेळ आपण अन्नाशिवाय राही काळ जगू शकतो. पण तहान लागल्यावर पाणी हवंच. कही जीव मात्र पाण्याशिवाय जगू शकतात. दुष्काळग्रस्त तसंच कोरड्या भागात राहणाऱ्या जीवांनी पाण्याशिवाय जगण्याच्या युक्त्या शोधून काढल्या आहेत. निसर्गानेच त्यांना अशा अनोख्या क्षमता दिल्या आहेत. हे प्राणी कही महिनेच नाही तर अनेक वर्षं पाण्याविना काढू शकतात. वाळवंटातलं कसव शरीरात पाण्याचा साठ करत ठेवतं. यामुळे दुष्काळी परिस्थितीत त्याचं कम भागतं. लॉटिन अमेरिकेतल्या गॅलेपॅगोस बेटावरचं कसवही हेच तंत्र वापरतं. हे कसव पावसाळ्यात झाडूच्या पानांवरून ओघळणारं पाणी शरीरातल्या पिशवीत साठवून ठेवतं. याचप्रमाणे ऑस्ट्रेलियात सापडणारा एक बेडूकतोंडवजवळच्या पिशवीत पाणी साठवून ठेवतो. आपल्या वजनाच्या दुप्पट पाणी तो साठवून ठेवतो. यामुळे हा बेडूक पुढची पाच वर्षं आरामात पाण्याशिवाय जगू शकतो. वाळवंटात राहणारे पक्षी, साप, मोठे बेडूक सुसरी, जंगली कुत्रे या बेडकच्या भरवशावर राहतात. तहान लागली की ते या बेडकला मारून खातात. उंट तसंच वाळवंटातली हरणं शरीरात चरबी साठवून ठेवतात. पाण्याची गरज पडली की चरबीचं पाण्यात रुपांतर करून आपली तहान भागवतात. घाम येऊनच म्हणून ते उन्हात बाहेर पडत नाहीत. तसंच मूत्र किंवा शौचाद्वारे पाणी जाणार नाही याचीही काळजी घेतात.



बेटाबरोबर १५ भुते मोफत

ट्रेक आयलंड नावाचे एक बेट आहे. ते विक्रीसाठी उपलब्ध आहे; परंतु ते खरेदी करणाऱ्यांना १५ भुते मोफत मिळतील, असे म्हटले जाते. इंग्लंडच्या प्लायमाउथपासून ६०० यार्ड्स अंतरावर एक बेट आहे. ते खूप भीतीदायक आहे. लोक तिथल्या अनेक भयकथा सांगतात. तेच बेट विक्रीसाठी सूचीबद्ध केले. डेव्हन किनाऱ्यावरील सहा एकरामध्ये वसलेल्या या बेटावर खारगी समुद्रकिनारा, तळघरी आणि आलिशान हॉटेलसाठी नियोजन परवानगी समाविष्ट आहे. येथे बोटीने पोहोचण्यासाठी १० मिनिटांपेक्षा कमी वेळ लागतो आणि एकदा तुम्ही येथे पोहोचलात की सर्वत्र लष्करी इतिहास दिसतो. बेटाच्या किल्ल्यामध्ये अनेक ऐतिहासिक गोष्टी आहेत. जुन्या बॅरेकसपासून तोफखान्याच्या बॅटरीपर्यंत, शेल शापट आणि भूमिगत गनपावडरही इथे आढळते. त्याचा इतिहास २,००० वर्षांहून अधिक आहे. पहिली इमारत ११३५ ची आहे.

सध्या बेटाचा आणि किल्ल्याचा लगाम आणि नेतृत्व मालमत्ता सल्लागार अली राणा यांच्याकडे आहे. राणा सांगतात, इथे राहायला येतील त्यांना एक्टे सोडले जाणार नाही. वरण, त्याला सोबत म्हणून १५ भुते मोफत मिळतील. ही सर्व १५ भुते ब्रिटिश सैनिक आहेत आणि ते जिवंत असताना आमचे रक्षण करत होते आणि आताही तेच करत आहेत. या सैनिक भुतांचा अनुभव खरोखरच चांगला असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.



पृथ्वीवरचा अखेरचा रस्ता

